बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | सोमवार,दि.२१ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक७९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## तुम्ही अर्ज भरा, कुणी कधी माघार घ्यायची हे मी सांगतो

# अखेर मनोज जरांगे निवडणुकीच्या रिंगणात!



### मनोज जरांगे यांच्या ३ मोठ्या घोषणा

१) निवडून येतील तिथे उमेदवार उभे करावेत.२)अनुसूचित जाती (एसटी) आणि अनुसूचित जमाती (एससी) म्हणजेच राखीव जागांवर उमेदवार देऊ नयेत. तिथे आपल्या समाजाची मते आपण आपल्याला वाटतात त्यांच्यामागे उभी करू.३) जिथे आपण उमेदवार उभे करणार नाही तिथे आपल्या मागणीशी ज्याला आस्था असेल तिथे त्यांना पाठिंबा देऊ, निवडून आल्यावर आमच्यासाठी आवाज उठवशील, असे आपण त्याच्याकडून स्टँम्प पेपरवर लिहून घेऊ.

**प्रस्थापित नेत्यांच्या उडाल्या झोपा** | **राज्याचे चित्र मनोज जरांगेंमुळे पूर्णपणे बदलणार** | **जिंकून यायच्या समीकरणांची जुळवाजुळव**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

केवळ एका जातीवर उमेदवार निवडून येऊ शकत नाही, हे वास्तव आहे. त्यामुळे पुढच्या तीन ते चार दिवसांत जिंकून यायची समीकरणे जुळतायेत का? याची चाचपणी करतो. तुम्ही अर्ज भरायला सुरुवात करा. परंतु मी ज्या दिवशी सांगेन त्यादिवशी संबंधितांनी अर्ज माघारी घेण्याची तयारी ठेवा, असे मराठा समाजाला जाहीरपणे सांगत मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी दर्शवली आहे.लढायचे की पाडायचे? यासाठी अंतरवाली सराटी येथे राज्यातील मराठा बांधवांच्या प्रतिनिधींची बैठक मनोज जरांगे पाटील यांनी बोलावली होती. या बैठकीत त्यांनी मराठा समाजाच्या प्रतिनिधींच्या भावना जाणून घेतल्या. आपण पान २ वर...

### एका जातीवर उमेदवार निवडून येणार नाहीत

विविध मतदारसंघातील परिस्थिती लक्षात घेतली तर केवळ एका जातीवर उमेदवार निवडून येऊ शकत नाही, हे वास्तव आहे. त्यासाठी विजयी समीकरणे जुळतायेत का, याची चाचपणी पुढच्या दोन चार दिवसांत करतो. तुम्ही अर्ज भरायला सुरुवात करा. परंतु २९ तारखेला मी ज्यावेळी संबंधितांना अर्ज माघारी घ्यायच्या सूचना करेल, त्यावेळी कोणतीही सबब न सांगता अर्ज माघारी घ्यावा. जर अर्ज माघारी घेतला नाही तर मी समजून जाईन की तुम्ही कुठल्या तरी पक्षाकडून पैसे घेतले आहेत.

# निवडणूक लढणार, अंतिम सत्य

### अनिलदादा जगताप: प्रचार दौऱ्याला प्रारंभ



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकांच्या रनधुमाळी सुरु झाल्या आहेत. बीड मतदार संघात सध्या अनिलदादा जगताप यांना मोठया प्रमाणात पसंती देण्यात येत असून अनिलदादा यांच्या प्रचार दौऱ्याची उत्सुकता शिगेला पोहचली असल्याचे दिसून येत आहे. अनिलदादा जगताप यांचे समर्थक, सहकारी, कार्यकर्ते देखील मोठ्या उत्साहात प्रचार दौऱ्याचे नियोजन करून आहेत. अनेक वर्षांपासून जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र तत्पर असणाऱ्या अनिलदादांना दादा तुम्ही आमदार व्हा, अशी आर्तहाक बीडकर देत आहेत. याच आर्तहाकेला ओ देऊन अनिलदादा जगताप महाराष्ट्राची धाकटी पांढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र नारायण गडाचे दर्शन घेऊन आपल्या प्रचार दौऱ्याचा आरंभ करत आहेत. येत्या मंगळवारी दि. २२ रोजी सकाळी श्री नगद नारायणाचे आशीर्वाद घेऊन अनिलदादा जगताप नवगण राजुरी पान २ वर...

### बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार!

वर्षानुवर्षे बीडची जागा शिवसेनेची आहे आणि ती शिवसेनेलाच सुटणार आहे. काहीजण या जागेवर अतिक्रमण करत असले तरी ही जागा शिवसेनेची आहे आणि ती शिवसेनेकडेच राहणार यात तिळमात्र शंका नाही. जनता आणि कार्यकर्ते यांच्या आग्रह आणि प्रबळ असणारी इच्छा लक्षात घेऊन मी निवडणूक कुठल्याही परिस्थितीत लढणार असल्याचे अनिलदादा जगताप यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हंटले आहे.

# विद्यमान आमदारांना भाजपची उमेदवारी

### यादी प्रसिद्ध : उमेदवारी न मिळालेले नेते नाराज

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठवाड्यातील ४६ पैकी २०१९ मध्ये निवडून आलेल्या १६ मतदारसंघातील उमेदवारांची नावे भारतीय जनता पक्षाने पहिल्या यादीमध्ये जाहीर केली. श्रीजया अशोक चव्हाण आणि अनुराधा चव्हाण या दोन नव्या महिला उमेदवारांसह २०१९ मध्ये निवडून आलेल्या सर्व आमदारांना भाजप निवडणुकीमध्ये उमेदवारी जाहीर केली आहे.फुलंब्री मतदारसंघातून निवडून येणारे हरिभाऊ बागडे हे राजस्थानचे राज्यपाल झाल्याने त्यांच्या मतदारसंघातून अनुराधा चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांचे पती सार्वजनिक बांधकाम विभागात उच्च पदस्थ अधिकारी आहेत. अलिकडेच हरिभाऊ बागडे यांच्या अभिष्टचिंतन सोहळयाच्या जाहीर कार्यक्रमात त्यांनी प्रास्ताविक भाषण केले होते. याच कार्यक्रमात बागडे यांच्या कार्यकतृत्वाच्या लघूचित्रफितीची निर्मिती अनुराधा चव्हाण यांनी केल्याचे आवर्जून स्पष्ट करण्यात आले होते.भाजपमध्ये दाखल झाल्यानंतर राज्यसभेत खासदार झालेले अशोक चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण यांना भोकरमधून उमेदवारी देण्यात आली आहे. गेल्या काही दिवसापासून त्यांनी भोकर मतदारसंघात संपर्क वाढविला होता. त्यामुळे त्यांचे नाव चर्चेत होते. मराठवाड्यात २०१९ मध्ये जिंकलेल्या अन्य सर्व आमदारांना भाजपने पुन्हा एकदा रिंगणात पान २ वर...

# जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ला

### घटना: दोन स्थलांतरित कामगारांची हत्या



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून जम्मू-काश्मीरमध्ये सातत्याने दहशतवाही हल्ल्याच्या घटना समोर येत आहे. अनेकदा दहशतवादी आणि भारतीय जवानामध्ये चकमकीच्या घटनाही समोर आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी दहशतवाद्यांनी दोन जवानाचं अपहरण केल्याची घटना घडली होती. यानंतर आता पुन्हा एकदा दहशतवाद्यांनी दोन लोकांवर गोळीबार करत हत्या केल्याची माहिती समोर आली आहे.जम्मू-काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यातील गगनगीर भागात दहशतवाद्यांनी दोन स्थलांतरित नागरिकांवर रविवारी रात्री हल्ला केला. या हल्ल्यात दोन कामगारांना जागीच मृत्यू झाला आहे. तसेच या घटनेत अनेक जण जखमी झाल्याचे वृत्तही समोर येत आहे. दरम्यान, हे दोघेही बोगद्याच्या प्रकल्पात काम करत होते. काम करत असतानाच हा हल्ला झाल्याचं सांगितलं जातं.या घटनेची माहिती देताना अधिकाऱ्यांनी सांगितलं की, जम्मू-काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यातील गगनगीर भागात रविवारी संध्याकाळी दोन स्थलांतरित कामगारांची दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून हत्या केली. हा हल्ला एका बांधकाम सुरू असलेल्या बोगद्याजवळ झाला. त्यानंतर सुरक्षा दलांनी हल्ल्याच्या ठिकाणी पोहोचून परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. यासंदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.प्राथमिक अहवालानुसार, हल्ले झालेले कामगार हे मध्य काश्मीरच्या पान २ वर...

# भाजपा नेत्याच्या घरी येणार पाकिस्तानी सून

### देशविदेश:नुकताच पार पडला ऑनलाईन विवाह

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

उत्तर प्रदेशातील भाजपाचे नेते तहसीन शाहिद यांचा मुलगा हैदरचा एका पाकिस्तानी मुलीशी ऑनलाईन पद्धतीने विवाह पार पडला आहे. या विवाह सोहळ्याला भाजपा नेत्यासह मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित असल्याचे बघायला मिळालं. मुलीला व्हिसा मिळण्यास विलंब होत असल्याने तसेच मुलीच्या आईची प्रकृती बरी नसल्याने त्यांनी ऑनलाईन पद्धतीने विवाह करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे.द इंडियन एक्सप्रेस'ने



दिलेल्या वृत्तानुसार, जौनपूरयेथील भाजपाचे नेचे तहसीन शाहिद यांनी जवळपास एक वर्षापूर्वी त्यांचा मोठा मुलगा हैदरचा विवाह पाकिस्तानच्या लाहौर येथील अंदलीप झाहर या मुलीशी निश्चित केला होता. त्यानंतर अंदलीप झाहराने भारतीय उच्चायुक्तांकडे व्हिसासाठी अर्ज केला होता. मात्र, भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावामुळे मुलीला व्हिसा मिळण्यास बराच विलंब झाला. अशातच काही दिवसांपूर्वी अचानक अंदलीप झाहराच्या आईची प्रकृती बिघडली. त्यांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले.अशा परिस्थितीत भारतात येणं शक्य नसल्याने दोघांनी ऑनलाईन पद्धतीने विवाह करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शुक्रवारी रात्री तहसीन शाहिद लग्नाच्या शेकडो पाहुण्यांसह इमामबारा कल्लू मरहूम येथे पोहोचले. पान २ वर...

**म्हणाल्या** बीड विधानसभा लढविण्यासाठी आम्ही सज्ज!

# 'शिवसंग्राम'च्या ज्योतीताई मेटे राष्ट्रवादीत

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिवसंग्राम पक्षाच्या नेत्या ज्योतीताई मेटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून बीडमधून ज्योतीताई मेटे यांना उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. रविवारी शरद पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील यांच्या उपस्थितीत ज्योती मेटे यांचा पक्ष प्रवेश पार पडला आहे. या पक्ष प्रवेशानंतर ज्योती मेटे यांनी प्रतिक्रिया देताना उमेदवारीसंदर्भात सूचक भाष्य केलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश करत असताना पान २ वर...



### शिवसंग्राम संघटनेची धुरा कोण सांभाळणार?

ज्योती मेटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केल्यानंतर शिवसंग्राम संघटनेची धुरा कोण सांभाळणार? असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला असता ज्योती मेटे म्हणाल्या, शिवसंग्राम संघटनेची धुरा कोण सांभाळणार हा विषय नाही. आपल्या सर्वांना आठवत असेल की विनायक मेटे यांच्या निधनानंतर झालेल्या आमसभेत माझी एकमताने अध्यक्षपदी निवड करण्यात आली होती. त्यामुळे संघटनेची धुरा कोण सांभाळणार हा प्रश्न निर्माण होत नाही, असं त्यांनी म्हटलं.

### बीडमधून ज्योती मेटेंना उमेदवारी मिळणार?

ज्योती मेटे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून बीडमधून ज्योती मेटे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. मात्र, अद्याप राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची विधानसभेसाठी उमेदवारांची यादी जाहीर झालेली नाही. पण बीडमधून ज्योती मेटेंना उमेदवारी मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत त्यांनी स्वत: देखील सूचक विधान केलेलं आहे

# बाबा सिद्दिकी प्रकरणात भंगार विक्रेता अटक

### खुलासा:शूटर्सना पुरवायचा शस्त्र

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांची १२ ऑक्टोबर रोजी रात्री हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली होती. त्यानंतर या प्रकरणात दररोज नवनवे खुलासे समोर येत आहेत. या घटनेत लॉरेन्स बिश्नोई टोळीचा सहभाग असल्याचीही माहिती समोर आली होती. या प्रकरणाचा तपास मुंबई पोलिसांची गुन्हे शाखा करत असून आतापर्यंत १० आरोपींना अटक करण्यात आली आहे.बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणाचा पोलिसांकडून कसून तपास सुरु आहे. आज मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने एका आरोपीला अटक केली आहे. हा आरोपी मूळचा राजस्थानमधील उदयपूरचा रहिवासी असल्याची माहिती सांगितली जात आहे. या आरोपीने १२ ऑक्टोबर रोजी बाबा सिद्दिकी यांची हत्या करणाऱ्या आरोपींना शस्त्र पुरवल्याचा आरोप आहे. भगवंत सिंग (३२) असं अटक करण्यात आलेल्या आरोपीच नाव असून तो नवी मुंबईत राहत होता. भगवंत सिंग याच्या पान २ वर...

### आरोपींनी केला होता स्नॅपचॅटचा वापर

या प्रकरणातील आरोपींनी माहिती शेअर करण्यासाठी स्नॅपचॅटचा वापर केला होता. तसंच, बाबा सिद्दिकींच्या हत्येतील आरोपीच्या फोनमध्ये बाबा सिद्दीकींचा मुलगा झिशान सिद्दिकींचा फोटो आढळून आल्याचं वृत्त समोर आलं. हे छायाचित्र आरोपींसोबत त्यांच्या हँडलरने स्नॅपचॅटद्वारे शेअर केले होते. गोळीबार आणि कट रचणाऱ्यांनी माहिती शेअर करण्यासाठी स्नॅपचॅटचा वापर केल्याचे तपासात उघड झालं आहे, अशी माहिती मुंबई पोलिसांनी याआधी दिली होती.



# ...पण घुसखोरांना हाकला!

बांगलादेशामधून भारतात आलेल्या निर्वासितांसाठी १७ नोव्हेंबरचा दिवस जणू सोनियाचा दिन ठरला. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर निर्वासित बांगलादेशीयांना भारताचे नागरिकत्व प्राप्त झाले आहे. निर्वासित बांगलादेशीयांचे भारतातील वास्तव्य हा अनेक वर्षांपासून वादाचा मुद्दा बनला होता. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालानंतर या वादावर कायमस्वरूपी तोडगा निघाला आहे. निर्वासित बांगलादेशीयांना भारताचे नागरिकत्व देण्यावर सुप्रीमच्या निकालातून अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने नागरिकत्व कायद्याचा '६ अ' विभाग घटनात्मकदृष्ट्या वैध असल्याचा निर्वाळा दिला. या विभागान्वये १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ या काळात आसाममध्ये आलेल्या स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्याची तरतूद आहे. न्यायालयाच्या पाच सदस्यीय खंडपीठाने चार विरुद्ध एक मतांनी ही तरतूद उचलून धरली. बेकायदा स्थलांतरितांच्या समस्येवर 'आसाम करार' हा राजकीय उपाय होता, अशी टिप्पणी सरन्यायाधीशांनी निकालात केली. नागरिकत्व कायद्यामध्ये विभाग '६ अ'ची विशेष तरतूद नंतर करण्यात आली. तत्कालीन राजीव गांधी सरकार आणि 'आसू' या संघटनेत झालेल्या आसाम करारांतर्गत हा विभाग कायद्यात समाविष्ट झाला होता. नागरिकत्व कायद्यामधील '६ अ' तरतूद वैध ठरवताना सरन्यायाधीश म्हणाले की, राज्याचा लहान आकार आणि परदेशातील नागरिक ओळखण्याची गुंतागुंतीची प्रक्रिया पाहता स्थलांतरितांची संख्या इतर राज्यांच्या तुलनेत अधिक आहे. न्या. एम. एम. सुंदरेश, न्या. मनोज मिश्रा तसेच न्या. सूर्यकांत यांनी सरन्यायाधीशांना सहमती दर्शवली, तर न्या. जे. बी. पारडीवाला यांनी मात्र '६ अ' विभाग वैध नसल्याचे मत नोंदविले. घटनापीठाचे सदस्य असलेल्या न्या. पारडीवाला यांनी निकालाच्या विरोधात वेगळे मत नोंदविले. या तरतुदीचा बनावट कागदपत्रांद्वारे गैरवापर होण्याची शक्यता अधिक असल्याचे त्यांनी जोडलेल्या टिप्पणीत म्हटले आहे. विभाग '६ अ'मधील तरतुदींत वेळेची कुठलीही मर्यादा नाही. विशिष्ट तारखेपर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत उल्लेख नाही. त्यामुळे बनावट कागदपत्रांद्वारे चुकीची तारीख दाखवून नागरिकत्व घेतले जाऊ शकेल, असे न्या. पारडीवाला यांचे मत आहे.

सुप्रीमच्या न्यायाधीशांमध्ये एकमत झाले नसले चार विरुद्ध एक अशा मतांनी हा ठराव मंजूर झाल्याने निर्वासित बांगलादेशी आता कायद्याने अधिकृतपणे भारतीय होणार आहेत. निर्वासित बांगलादेशी ही समस्या आजची नसून तब्बल अर्धशतकापूर्वीची समस्या होती. या वादावर आता अर्धशतकीय वाटचालीनंतर तोडगा निघाला आहे. तरी आसाम व पश्चिम बंगालच्या राजकारणावर सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाचा दूरगामी परिणाम होणार आहे. बांगलादेशातून भारतात अनधिकृतरीत्या येण्याचे व अवैधरीत्या वास्तव्य करण्याची प्रकरणे आजही सुरू असून त्या त्या राज्यातील पोलिसांकडून अनधिकृत बांगलादेशीयांची शोध मोहीम राबविण्यात येत असते. १९८५ मध्ये आसाम करारामध्ये नागरिकत्व कायद्याचे कलम ६ ए जोडण्यात आले होते. या कायद्यानुसार १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ दरम्यान आसाममध्ये आलेले बांगलादेशी स्थलांतरित भारतीय नागरिक म्हणून आपली नोंदणी करू शकतात. तथापि, २५ मार्च १९७१ नंतर आसाममध्ये येणारे परदेशी भारतीय नागरिकत्वासाठी पात्र नाहीत. कलम ६ एची घटनात्मक वैधता या निकालाने कायम ठेवण्यात आली आहे. आम्ही कोणालाही शेजारी निवडण्याची परवानगी देऊ शकत नाही आणि ते बंधुतेच्या तत्त्वाच्या विरोधात आहे. जगा आणि जगू द्या हे आमचे तत्त्वज्ञान आहे, हे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने पुन्हा एकवार स्पष्ट झाले आहे. आसाममधील ४० लाख स्थलांतरितांचा प्रभाव पश्चिम बंगालमधील ५७ लाख स्थलांतरितांपेक्षा जास्त आहे. कारण आसाममधील जमीन पश्चिम बंगालच्या तुलनेत खूपच कमी आहे. पश्चिम बंगालमध्ये बांगलादेशातून आलेला मतुआ समुदायाचे हिंदू निर्वासित अनेक वर्षांपासून नागरिकत्वाची मागणी करीत होते. देशात त्यांची संख्या ३-४ कोटी आहे. यापैकी २ कोटी बंगालमध्ये आहेत. या समुदायाचा राज्यातील १० लोकसभा आणि ७७ विधानसभा जागांवर राजकीय प्रभाव आहे. सीएए लागू झाल्यामुळे सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे त्यांना आता कायमस्वरूपी नागरिकत्व मिळणार आहे. भाजपाने २०१९ मध्ये सीएएच्या आश्वासनावर ४२ पैकी १८ जागा जिंकल्या होत्या. २०१४ मध्ये त्या ३ होत्या. २०२१ च्या निवडणुकीत भाजपा दुसऱ्या क्रमांकावर होता. आसाममध्येही २० लाखांवर हिंदू बांगलादेशी बेकायदा वास्तव्य करीत आहेत. आसामच्या एकूण ३.५ कोटी लोकसंख्येत अनेक जागांवर बांगलादेशातून आलेल्या निर्वासितांचा प्रभाव आहे.

# प्रियंका गांधी संसदेत दिसतील?



नेहरू -गांधी कुटुंब हे एक भारतीय राजकारणातील महत्वाच स्थानी असलेल कुटुंब आहे. ज्याचा राजकीय वारसा इथपर्यंत चालला आहे.ज्याने भारताच्या राजकारणात एक प्रमुख स्थान व्यापले आहे . नेहरू नंतर गांधी कुटुंबाचा सहभाग हा भारतीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आहे. देशात सत्तांतर झाले असले तरी राजकारण गांधी घराण्याभोवती फिरत आहे. पारंपारिकपणे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसभोवती फिरत आहे , कारण कुटुंबातील विविध सदस्यांनी पक्षाचे नेतृत्व केले आहे. कुटुंबातील तीन सदस्य पंडित जवाहरलाल नेहरू , इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून काम केले तर इतर अनेक जण कुटुंबातील सदस्य संसदेचे सदस्य झाले .नेहरू- गांधी कुटुंबातील काही प्रमुख चर्चेतील राजकारणी मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, कमला नेहरू,विजया लक्ष्मी पंडित, कृष्णा हुथीसिंग, इंदिरा गांधी, फिरोज गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी, मेनका गांधी, राहुल गांधी, वरुण गांधी आहेत. आता काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय सरचिटणीस प्रियांका गांधी या खूद्द लोकसभेच्या पोटनिवडणुकीत उमेदवार म्हणून उभ्या आहेत. उत्तर प्रदेशच्या प्रभारी , अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस म्हणून त्यांनी पक्षाला बळ दिले. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी आणि सोनिया गांधी यांच्या कन्या म्हणून जरी ओळख असली तरी त्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांसमवेत काम केले आहे. राजकीयदृष्ट्या त्या नेहरू- गांधी परिवारातील असल्या तरीही २०१९ मध्ये त्यांनी अधिकृतरित्या राजकारणात प्रवेश केला. त्यांनी पक्षाच्या सरचिटणीस म्हणून पक्षाला उंचीवर घेऊन जाण्यात त्यांचा सहभाग आणि श्रम पक्ष संघटनेत अद्वितीय. २०२३ मध्ये झालेल्या कर्नाटक विधानसभा निवडणूक आणि २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत त्या केंद्रस्थानी होत्या. त्यांच्या नेतृत्त्वाखाली या निवडणुका लढवण्यात आल्या.राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेपासून तर त्यांची ओळख आजी इंदिरा गांधी यांची छबी दिसू लागली. आजोबा फिरोज गांधी, आजी इंदिरा गांधी ,वडिल राजीव गांधी, आई सोनिया गांधी,भाऊ खा. राहुल गांधी आणि आता प्रियंका गांधी वाड्रा संसदेत दिसतील? प्रियंका गांधी वाड्रा यांचा जन्म १२ जानेवारी, १९२२ रोजी दिल्लीत झाला.प्रियंका गांधी यांचे शालेय शिक्षण नवी दिल्लीतील मॉडर्न स्कूल आणि कॉन्व्हेंट ऑफ जीझस अँड मेरी, येथे झाले. त्यांनी जीझस अँड मेरी कॉलेज, दिल्ली विद्यापीठातून मानसशास्त्रात पदवी प्राप्त केली आहे. नंतर २०१० मध्ये बौद्ध अभ्यासात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली.

एक भारतीय राजकारणी म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. पण,त्या संसदेच्या कोणत्याही सभागृहाच्या सदस्य नाहीत.सध्या प्रियंका यांच्याकडे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस पदाचा पदभार आहे.राजीव आणि सोनिया गांधी यांच्या कन्या, राहुल गांधींची बहीण आणि फिरोज आणि इंदिरा गांधी यांच्या नात . त्यामुळे त्या राजकीयदृष्ट्या प्रमुख नेहरू -गांधी परिवाराच्या सदस्य आहेत. तसेच त्या राजीव गांधी फाउंडेशनच्या विश्वस्तही आहेत.त्यांची राजकीय कारकीर्द आई सोनिया गांधी व भाऊ राहुल गांधी यांच्या हाताला हात धरून झाली असली , तरी नंतर त्यांनी आई सोनिया गांधी यांच्या आणि भावाच्या रायबरेली आणि अमेठीच्या मतदारसंघांना नियमित भेट देऊन सोनिया गांधी यांना २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत निवडून आणन्यात आणि २०२४ च्या त्याच रायबरेली लोकसभा मतदारसंघात भाऊ राहुल गांधी यांना निवडणूक



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

आणन्यात त्यांची महत्वाची भुमिका होती. त्या नेहमी थेट लोकांशी संवाद साधत असायच्या. २००४ च्या भारतीय सार्वत्रिक निवडणुकीत, त्या आई सोनियांच्या प्रचार व्यवस्थापक होत्या आणि त्यांनी भाऊ राहुल गांधी यांच्या प्रचारावर देखरेख त्यांची होती.

२००७ च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत, राहुल गांधींनी राज्यव्यापी प्रचाराची धुरा सांभाळत असताना, त्यांनी अमेठी रायबरेली प्रदेशातील दहा जागांवर लक्ष केंद्रित केले, जागा वाटपावरून पक्षाच्या कार्यकर्त्यांमधील भांडण शमविण्यासाठी दोन आठवडे घालवले.२३ जानेवारी २०१९ रोजी, प्रियंका गांधी यांनी अधिकृतपणे राजकारणात प्रवेश केला, त्यांना उत्तर प्रदेशच्या पूर्व भागाच्या प्रभारी काँग्रेसच्या सरचिटणीसपदी नियुक्त केले गेले.११ सप्टेंबर २०२० रोजी संपूर्ण उत्तर प्रदेश प्रभारी महासचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली.याच महिन्यात ऑक्टोबर २०२१ मध्ये, पोलीस कोठडीत मरण पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी आग्रा येथे जात असताना गांधींना पोलिसांनी ताब्यात घेतले, त्यांनी मेळाव्यावर बंदी घातली होती.२०२२ साली देशातल्या सर्वात मोठ्या राज्याच्या उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुका लागल्या.प्रियंका गांधी यांनी २३ ऑक्टोबर २०२१ रोजी बाराबंकी येथून काँग्रेस पक्षाच्या उत्तर प्रदेश निवडणूक प्रचाराची सुरुवात केली. काँग्रेस पक्षाने उत्तर प्रदेश विधानसभेची निवडणूक प्रियंका गांधी यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या.त्यांची रणनीती पाहून त्या २०२२ च्या उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसकडून मुख्यमंत्रीपदाचा चेहरा होण्याची शक्यता कोणिही नाकारू शकत नव्हते. कारण, त्यांनी त्या निवडणुकीत स्वतः ला झोकून दिले. निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले नाही हा वेगळा भाग. राजकारणाशी कसलाच संबंध नसलेल्या दिल्लीतील व्यापारी रॉबर्ट वाड्रा यांच्याशी त्यांचे लग्न झाले. अतिशय साध्या पद्धतीने १८ फेब्रुवारी १९९७ रोजी सोनिया गांधींच्या घरी, १० जनपथ येथे हा विवाह पारंपारिक हिंदू समारंभात झाला. एक मुलगा आणि मुलगी अशी दोन मुले असलेल्या प्रियंका गांधी यांचा राजकीय प्रवास गांधी कुटुंबाकडून वाटचाल करीत आहे. राजकारणात सक्रिय असलेल्या आणि काँग्रेसचा धर्मनिरपेक्ष विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी मेहनत घेणाऱ्या प्रियंका गांधी आता नवीन गांधी कुटुंबातील आणखी एक सदस्य संसदेत दिसू लागेल. केरळच्या वायनाड या लोकसभा मतदारसंघातून लोकसभेची पोटनिवडणूक काँग्रेस पक्षाकडून लढवणार आहेत. या मतदारसंघांतून त्या निवडून आल्या तर त्यांची खासदार म्हणून असलेली नवी ओळख पहायला मिळेल.

## पान एक वरून

**तुम्ही अर्ज भरा, कुणी कधी माघार**

स्वत: निवडणूक लढायची की ज्यांनी आपले वाटोळे केले, त्यांना पाडण्याची भूमिका घ्यायची? असा प्रश्न जरांगे यांनी समाज बांधवांना विचारला. कोणतीही भूमिका घेतली तरी त्याचे परिणाम आणि दुष्परिणाम आपणाला पाहायला लागतील, असे सांगत जरांगे यांनी मध्यम मार्ग काढला.मनोज जरांगे पाटील म्हणाले, माझा विश्वासघात होऊ देऊ नका. जर लढायचे ठरले तर दोघांचेही कार्यक्रम करायचे. आपले मराठा आंदोलन आणि मी स्वत: उघडा पडलो तर आपली जात संपून जाईल, त्यामुळे काळजीपूर्वक वागा. १०० टक्के मतदान करा आणि ज्यांनी आपल्याला संपविण्याच्या प्रयत्न केला, त्यांना आपण आता संपवायचे, असे जरांगे म्हणाले.

**निवडणूक लढणार, अंतिम**

सर्कलमधील सर्व गावांना भेटी देणार आहेत. यानंतर दुसऱ्या सत्रात बीड शहरातील काही प्रभागातील कुटुंबियांच्या भेटी घेणार आहेत. शिवसेना पक्ष जी भूमिका घ्यायची ती भूमिका घेईल. मात्र अनिलदादा यांच्या झंजावताला येणाऱ्या २२ तारखेपासून सुरुवात होत आहे. अनिलदादा जगताप यांनी यापूर्वीही अनेकदा पत्रकार परिषदेत मी विधानसभा निवडणूक लढवणारच आहे, अशी भूमिका स्पष्ट केली होती. पक्षाची भूमिका कोणतीही असो मात्र बीडकरांच्या हितासाठी आणि बीडच्या विकासाचा कायापालट करण्याकरिता कार्यकर्ते आणि जनतेच्या आग्रहास्तव निवडणूक लढणार आहेत व यासाठीचेच पाहिले पाऊल म्हणजे अनिलदादा जगताप आपल्या प्रचार दौऱ्याचा आरंभ नारायण गडापासून करत आहेत. गेल्या सदोतीस वर्षांच्या राजकीय प्रवासात अनिलदादांनी शिवसेना आणि बाळासाहेबांच्या विचारांशी एकनिष्ठ राहिलेले आहेत व आजही हेच विचार घेऊन अनिलदादा जगताप आपला प्रचार दौरा सुरु करत आहेत. बीड मतदार संघात सध्या अनिलदादा जगताप यांना सर्वोपरी पोषक वातावरण तयार झालेले आहे. आजवर विधानसभा निवडणुकीत अनेकांना संधी दिली. मात्र यावेळी अनिलदादांना संधी देऊ असा सुर बीड मतदार संघात चांगलाच उमठला आहे. अशा परिस्थितीत अनिलदादा जगताप यांच्या प्रचार दौऱ्याला होत असलेला प्रारंभ विजयाची नांदी ठरणारा असणार आहे.

**विद्यमान आमदारांना भाजपची**

उतरविले असून यामध्ये तीन महिलांचा समावेश आहे. उमेदवारी देण्यात तिसऱ्या महिला उमेदवार नमिता मुंदडा या केज मतदारसंघातून २०१९ मध्ये निवडून आल्या होत्या. जिंतूरमधून मेघना बोर्डीकर यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे.मराठवाड्यात २०१९ मध्ये भारतीय जनता पक्षाचे १६ आमदार निवडून आले होते. तत्पूर्वी २०१४ मध्ये भाजपचे मराठवाड्यात १५ आमदार होते. त्यामुळे या वेळी भाजपचे प्रभाव क्षेत्र वाढते की नाही, याची उत्सुकता आहे. मराठवाड्यातून उमेदवारी देण्यात आलेल्या उमेदवारांमध्ये प्रामुख्याने औरंगाबाद पूर्व मतदारसंघातून मंत्री अतुल सावे यांचे नाव आहे. सावे हे सलग दोन वेळा निवडून आले आहेत. माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे चिरंजीव संतोष दानवे, बबन लोणीकर, नारायण कुचे यांना उमेदवारी देण्यात आली असून हे तिघांनीही दोन व तीन वेळा विधानसभेत मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर मतदारसंघातून प्रशांत बंब यांना उमेदवारी देण्यात आली आहे.धाराशिवमधील भाजपच्या वाट्याला आलेल्या एकमेव तुळजापूर मतदारसंघात राणाजगजीतसिंह पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. लातूर जिल्ह्यातील निलंगा मतदारसंघातून संभाजी पाटील निलंगेकर , औसा मतदारसंघातू अभिमन्यू पवार यांची उमेदवार म्हणून नावे जाहीर जाहीर झाली आहेत. लातूर शहरमधून उमेदवारीसाठी इच्छूक असणाऱ्या अर्चना पाटील चाकुरकर यांचे नाव पहिल्या यादीत समाविष्ट नाही. लाडकी बहीण योजनेवर भाजप प्रचाराचा जोर असल्याने महिला उमेदवारांना किती स्थान दिले जाईल याची उत्सुकता होती. मराठवाड्यातून जाहीर करण्यात आलेल्या १६ मतदारसंघामध्ये चार महिला उमेदवारांना संधी देण्यात आली आहे.

**भाजपा नेत्याच्या घरी येणार**

यावेळी टीव्ही स्क्रीनवर सर्वांसमोर ऑनलाइन विवाह सोहळा पार पडला. दोन्ही बाजुंच्या काझींनी हे लग्न लावून दिले.यासंदर्भात बोलताना शिया धर्मगुरू मौलाना महफूजू एल हसन खान म्हणाले, इस्लाम धर्मात लग्नासाठी मुलीची परवानगी आवश्यक आहे. मुलीने ही परवानगी दिली, तर दोन्ही पक्षातील मौलाना त्या-त्या ठिकाणी विवाह करून देऊ शकतात. दोन्ही देशांमधील बिघडलेल्या राजकीय संबंधांमुळे दोन्ही बाजूंच्या लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अशा स्थितीत दोन्ही देशांच्या राज्यकर्त्यांची इच्छा असेल तर ही समस्या चर्चेतून सोडवता येईल. या विवाह सोहळ्याला भाजपाचे आमदार ब्रिजेश सिंग प्रिशू यांच्यासह मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते. तसेच पाकिस्तानमध्येही शेकडो नागरिक या विवाहचे साक्षीदार झाले. या विवाह सोहळ्यानंतर माध्यमांशी बोलताना, आपल्या पत्नीला लवकरच व्हिसा मिळेल आणि ती भारतात येईल, असा विश्वास हैदरने व्यक्त केला.

**जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी**

गांदरबल जिल्ह्यातील गगनीरला सोनमर्गला जोडणाऱ्या झेड मोर बोगद्यावर काम करणाऱ्या बांधकाम टीमचा भाग होते. १८ ऑक्टोबर रोजी शोपियान जिल्ह्यात बिहारमधील एका स्थलांतरित कामगाराची दहशतवाद्यांनी हत्या केली होती. त्या घटनेनंतर आज पुन्हा एकदा दोन स्थलांतरित कामगारांची दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून हत्या केली. या घटनेनंतर स्थानिकांना या कामगारांचा गोळ्यांनी छिन्नविच्छिन्न केलेले मृतदेह आढळून आले. त्यानंतर ही माहिती सुरक्षा रक्षकांना देण्यात आली.दरम्यान, या घटनेनंतर लगेचच सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला असून हल्लेखोरांना लवकरात लवकर पकडता यावे, यासाठी शोध मोहीम राबवली जात आहे. या घटनेवर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी शोक व्यक्त केला. ते म्हणाले की,मी या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध करतो आणि पीडितांच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त करतो.

**'शिवसंग्राम'च्या ज्योतीताई मेटे**

विधानसभा निवडणुकीचेच कारण आहे. आमची शिवसंग्राम संघटना समाजकारण करते. त्यामुळे समाजकारणाला राजकारणाची जोड देऊन पुढे जाण्यासाठी हा पक्ष प्रवेश केला आहे. बीड विधानसभा मतदारसंघासाठी आम्ही आमचा प्रस्ताव मांडलेला आहे. आमची यासंदर्भात चर्चा झालेली आहे. त्यामुळे आम्ही हा निर्णय घेतला. त्यामुळे आम्ही पक्षाने सांगितलेली सर्व जबाबदारी योग्य पद्धतीने पार पडणार आहोत, अशी प्रतिक्रिया ज्योती मेटे यांनी पक्ष प्रवेश केल्यानंतर दिली.

**बाबा सिद्दिकी प्रकरणात**

अटकेनंतर कोठडीत असलेल्या एकूण आरोपींची संख्या १० वर पोहोचली आहे.भगवंत सिंग या आरोपीला पोलिसांनी अटक केल्यानंतर न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने २६ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, भगवंत सिंगने आरोपींना पुरवलेले शस्त्र कोठून आणले होते? त्याने ते शस्त्रे कसे पुरवले? तो राजस्थानमधून शस्त्रे घेऊन मुंबईत आला होता का? अशा सर्व गोष्टीचा तपास आता पोलिसांकडून करण्यात येणार आहे. दरम्यान, भगवंत सिंग हा भंगार विक्रेत्याचं काम करत होता, अशीही माहिती समोर येत आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.दरम्यान, बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात गोळीबार करणाऱ्यांपैकी धर्मराज कश्यप, गुरमेल सिंह या दोघांना घटनास्थळावरून अटक करण्यात आली होती. या दोघांना २१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांकडून त्यांची चौकशी केली जात आहे. या प्रकणातील शिवकुमार गौतम आणि हत्येच्या कटात सहभागी असलेले अन्य दोन जण फरार आहेत.

## पान सहा वरून

**शिर्डी एक्सप्रेस लुटीचा**

शाखेचे पोलीस कर्मचारी यांनी घटनस्थळाला भेट देऊन सुरक्षाचे दृष्टीने योग्य त्या सूचना दिल्या याप्रसंगी परळी लोहमार्ग पोलीस स्टेशन चे सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथवाघमोडे व स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत गंभीरराव,रेल्वे सुरक्षा बलाचे सब इन्स्पेक्टर कांबळे,पोलीस अमलदार संजय भेंडेकर, परळी रेल्वे पोलीस ठाण्याचे क्राईम शाखेचे अनंत कांबळे. कोंडीराम सातपुते. आदी उपस्थित होते.

**अनधिकृत कर पावत्या**

कार्यालयामध्ये घेतली जात नाही. नाइलाजास्तव परळी शहरातील नागरिकांना इच्छा नसतानाही कर भरावा लागतो. सदरील काराबद्दल राजेभाऊ श्रीराम फड यांनी वेळोवेळी मुख्य अधिकारी परळी नगरपरिषद परळी वैजनाथ यांच्याकडे लेखी अर्ज देऊन सदरील कराबद्दलची माहिती मागितली असता त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली शेवटी दिनांक २४/०६/२०२४ रोजी केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सदरील काराबद्दल माहिती मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला असता मुख्य अधिकारी परळी नगरपरिषद यांनी सदरील कराबाबत माहिती दिली नाही व वर्षानुवर्षे अशा प्रकारचें अनाधिकृतपणे कर वसुली करत आहेत. याबाबत उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात न्यायालयीन लढाई सुरू आहे. नगर पालिकेने अनधिकृतपणे वसूल केलेल्या कराची रक्कम नागरिकांना तत्काळ परत करावी व यापुढे हा प्रकार थांबवावा अशी मागणी राजेभाऊ फड यांनी केली आहे. तर मागील पाच वर्षांत नागरिकांना याची मोठ्या प्रमाणावर झळ बसली आहे. अनधिकृत एक टक्का वाढीव भरावा लागलेल्या नागरिकांनी कर भरलेल्या पावत्या असतील तर त्या आमच्या संपर्क कार्यालयात जमा कराव्यात असे आवाहन केले आहे.

**मतदान यंत्रांचे पहिले**

ईव्हीएममशीन्स विधानसभा निहाय स्थलांतर करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.त्याप्रमाणे आज २२८-गेवराई, २२९-माजलगाव, २३०- बीड, २३१-आष्टी, २३२-केज, २३३-परळी विधानसभा मतदार विभागासाठी ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन्सचे प्रथम सरमिसळ (1 Randomization) करण्यात आली आलेली आहे. आता या सरमिसळ (1 Randomization) प्रक्रियेनंतर या ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीन भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे आणि विहित कार्यपद्धतीप्रमाणे योग्य त्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात येणार आहेत.

**परळी विधानसभेच्या उमेदवारीचे**

येथे रोजगार मिळाला, याबद्दलही चर्चा झाली. आतापर्यंत केलेल्या कामांचा कार्य अहवाल शरद पवार साहेबाना सादर केला.तसेच परळी मतदार संघात विधानसभेसाठी इच्छुक असल्याचा माता पुत्राकडुन उमेदवारी आम्हालाच मिळावी अशी मागणी करताच तुम्ही परत मतदारसंघात जाऊन जोमाने कामाला लागा अश्या सुचना पक्षश्रेष्ठींनी दिल्या आसल्याने सुनील गुट्टेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तथा महाविकास आघाडीचे उमेदवार असतील या तातडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार साहेब, राज्य अध्यक्ष जयंत पाटिल,खा.सुप्रिया सुळे,आ.रोहित दादा पवार यांची भेट युवानेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांनी भेटी घेतल्याने राजकीय चर्चाना बळ मिळत आहे.

**रस्त्यावरचे अतिक्रमण मर्यादेच्या**

लागतो आहे तरी सुद्धा संमंधीत प्रशासनाला जाग येते नाही ही अतिशय निंदनीय बाब आहे कारण ऐवढे अतिक्रमण आहे तरी संमंधीत प्रशासन झोपेचे सोंग घेऊन गप्प बसले आहे तरी संमंधीत प्रशासनाने टाकळी फाटा ते चिंचोली माळी ते हादगाव रोडवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घ्यावी अशी मागणी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**नाना महाराज पुण्यतिथीत**

उपकार करण्यासठी सदैव तत्पर असतो त्याच्या ठिकाणी दुजा भाव नसतो. ज्यात परोपकार आहे असे काम संपन्न करण्यात त्याला मोठा लाभ वाट असतो अश्यावेळी त्याला किती श्रम करावे लागतात याचा तोविचार हि करत नाही व परवा हि करत नाही. असा हा मनुष्य इतरांच्या जीवाची काळजी घेतो व हा मनुष्य म्हणजे फक्त सद्गुनांचीच खाण असते. तुकाराम महाराज म्हणतात अश्या प्रकारे आपल्या हृदयात ज्याने परोपकाराचे धैर्य जपलेले असते त्या भक्तांचा देव अंकित झालेला असतो. या विषयावर आपल्या साध्या सोप्या भाषेत भाविकांना मंत्रमुग्ध केले.या कार्यक्रमाचे आयोजन वैकुंठवासी शांती ब्रम्ह सद्गुरू ह.भ.प.श्रीधर नाना यांचे सुपुत्र ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज गिरी व समस्त गावकरी यांनी केले असून यावेळी सुप्रसिद्ध गायक गायक अशोक महाराज बोराडे, रविकुमार गायकवाड, ह.भ.प. आबा महाराज मेहरकर, सुनील महाराज केंद्रे, शाम महाराज हारकळ वैजनाथ बुवा पांचाळ, तर मृदंगसाथ मृदंगाचार्य सुनील महाराज गालफाडे यांनी केली.यावेळी इंजेगाव येथील सदभक्त कराड साहेब यांच्या सह गावातील, परिसरातील व वैकुंठवासी शांती ब्रम्ह सद्गुरू श्रीधर नाना यांच्या वर प्रेम करणारे भाविक भक्त विविध भागातुन उपस्थित होते.

**सत्ताधारी म्हणतात विकास**

फ़्वढे सारे प्रश्न प्रलंबित असताना नेमका विकास कोणता केला ? हे मात्र समजायला मार्ग नाही. आणि आम्ही मतदारसंघाचा किती विकास केला याचा डांगोरा मात्र पिटल्या जात आहे. तर दुसरीकडे या निवडणुकीसाठी डझनवर इच्छुक उमेदवार मतदार संघात डेरेदाखल झाले आहेत. जिथे नाही तिथे जाऊन सत्ताधाऱ्यांचा निष्क्रियपणा आणि आम्ही निवडून आल्यानंतर विकास काय असतो हे दाखवून देऊ अशी वल्गना करत आहेत. आश्वासने देताना अगदी चंद्र तारे सुद्धा तोडून आणून असे सांगायला ते कचरत नाहीत. मात्र प्रत्येक निवडणुकीत जे काही होते तेच मागच्या तीन-चार महिन्यांपासून ऐकायला मिळत आहे. विकासाच्या वल्गना आणि विकासाची स्वप्न हे ऐकूनच मतदारांना भुलवत ठेवण्याचा एक कलमी कार्यक्रम सध्या तरी दिसून येत आहे. दरम्यान एवढी वर्षे सत्ता आपल्या हाती असताना प्रश्न जर प्रलंबित असतील आणि आम्ही किती विकास केला हे सांगण्याची वेळ जर येत असेल तर खरोखरच विकास झालाय का ? याचाही विचार मतदारांनी करण्याची गरज आहे. कारण सूर्य उगवल्यानंतर मी उगवलो आहे हे सांगण्याची गरज सूर्याला भासत नाही. मग विकास आम्हीच केलाय हे सांगण्याची गरज सत्ताधारी आमदारांना का लागावी ? हे कोडेच आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी काहीच केले नाही आणि इच्छुक काही करतील असा विश्वास नसल्याने कुणी कितीही वल्गना केल्या तरी केज मतदार संघातील नागरिकांच्या संघर्षामध्ये काही फरक पडणार का ? याचाही डोळसपणे विचार करणं गरजेचं आहे. एक कुणीतरी निवडून येणारच आहे आणि मतदार संघाचे प्रतिनिधित्व करणारच आहे. परंतु वर्षानुवर्ष असेच चालत राहिले तर मतदारांनी नेमकं कुणाकडे बघायचं हा प्रश्न अनुत्तरीत आहे.

संपादक : बाळासाहेब भगवान मस्के, कार्यकारी संपादक : सुनिल मसू डोंगरे
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# थकीत वेतनासाठी आंदोलन सुरु

## आक्रमक बावीस दिवस झाले आंदोलन सुरुच

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

थकीत व चालू वेतना साठी सिरसाळा ग्रामपंचायत कर्मचारी दिनांक ३० सप्टेंबर रोजी पासुन ग्रामपंचायत कार्यालय समोर बेमुदत काम बंद आंदोलनास बसले आहेत, आज अंदोलनाचा २२ वा दिवस आहे. अद्याप ह्या अंदोलनाचा तिढा सुटला नाही, काही दिवसापुर्वी बीडीओ नागरगोजे यांनी या ठिकाणी अंदोलन कर्त्यांना भेट दिली व सकारात्मक चर्चा केली ,याच बरोबर सरपंच अन्वर पट्टेदार यांनी तडजोड करत काही रक्कम अनामत देण्याचे कबूल केले होते. मात्र ग्रामपंचायत कर्मचारी आता थकीत पुर्ण वेतन अदा करावेत या मागणीवर ठाम राहिले आहेत. सरपंच अन्वर पट्टेदार यांनी अंदोलन कर्त्यां सोबत अनेक वेळा चर्चा केली. मात्र यावर तोडगा निघाला नाही . आज घडीला ग्रामपंचायतीची आर्थीक परिस्थिती खराब आहे,पाणी पट्टी, घर पट्टी, गाळे व्यावसायिक भाडे व इतर मार्गाने येणारे उत्पन्नाचा ओघ नाही असे सरपंच अन्वर पट्टेदार म्हणाले ,सरंपच,गट विकास अधिकारी यांनी अंदोलन कर्त्यां समोर सर्व काही पर्याय खुले केले होते .यावर तोडगा निघाला नाही. कर्मचारी आपल्या मुद्द्यावर ठाम राहिले आहेत. अंदोलनाचे प्रतिनिधीत्व करणारे विश्वंभर देशमुख ( कारकून) म्हणाले कि, आता आम्ही निर्धार केला आहे कि, जो पर्यंत आम्हाला आमच्या मागण्या नुसार आमचे थकीत वेतन दिले जात नाही तो पर्यंत अंदोलन सुरु ठेवण्याचा निर्धार केला आहे . मग कितीही दिवस लागले तरी चालतील.





### थकीत वेतन तात्काळ देतो: पट्टेदार

माझ्या आता पर्यंत च्या काळातले बावीस महिन्यांमध्ये आठरा महिण्यांचे वेतन कर्मचाऱ्यांना दिलेले आहे . माझ्या कार्यकाळातील केवळ चार महिण्यांचे थकीत वेतन राहिले आहे.ते देण्यास मी तयार आहे दोन वेळेस भेटून त्यांना पत्र दिले, पाच/सहा वेळा जाऊन चर्चा केली. ९ लाख ६१ हजार मागील च्या काळातला वेतन बाकी आहे. तेही जशी वसुली येईल तसा दिला जाईल, पंधरावा वित्त आयोग किंवा चौदावा वित्त आयोगातून पैसे देता येत नाही असे गट विकास अधिकारी साहेब म्हणले आहेत. अशी प्रतिक्रिया सरपंच अन्वर पट्टेदार यांनी दिली आहे .

# बस स्थानकाचा स्लॅब कोसळला

## अस्मानी: मुसळधार पावसाचा फटका



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

भरपावसात निमखेडी बस स्थानकाचा स्लॅब कोसळल्याची घटना शुक्रवारी रात्री एक वाजता घडली दरम्यान रात्रीच्यावेळ असल्याने कोणताही अनर्थ घडला नाही

सोयगाव-बनोटी रस्त्यावर असलेल्या निमखेडी फाट्यावर बस स्थानकाचा भरपावसात स्लॅब कोसळून बस स्थानक धोकादायक झाले आहे त्यामुळे शनिवारी पहाटेपासून प्रवाशांची गैरसोय झाली होती दरम्यान रात्रीची वेळ असल्याने कोणताही अनर्थ घडला नसल्याचे प्रशासन कडून स्पष्ट करण्यात आले आहे सोयगाव परिसरात शुक्रवारी रात्री अतिवृष्टी चा मुसळधार पाऊस झाला दरम्यान या वादळीपावसाने निमखेडी बस स्थानकचा स्लॅब कोसळला आहे शनिवारी महसूल कडून घटनेचा पंचनामा करून संबंधित विभागाला अहवाल पाठविण्यात आला आहे.

# याह्या सिनवार बोगद्यात लपला होता

## व्हिडीओ शेअर: पत्नीकडे दिसली २७ लाखांची बॅग



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

हमासचा म्होरक्या याह्या सिनवार इस्रायलयी सैन्याने केलेल्या कारवाईमध्ये शुक्रवारी मारला गेला. याह्या सिनवारला इस्रायलच्या सैन्याने ठार केल्यानंतर त्या घटनेचा एक व्हिडीओ इस्रायलच्या लष्कराकडून शेअर करण्यात आला होता. त्या व्हिडीओमध्ये याह्या सिनवार (धरहूर डळपुरी) गंभीर जखमी अवस्थेत एका उद्धस्त घरात हातानिशी बसल्याचं दिसला होता. त्याला ठार करण्याच्या काही क्षण आधीचा हा व्हिडीओ असल्याचं सांगण्यात आलं होतं. त्यानंतर त्याला ठार करण्यात आलं. आता याह्या सिनवार आणि त्याच्या कुटुंबाचा एक व्हिडीओ इस्रायलकडून शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये याह्या सिनवार आपल्या मुलांसह आणि पत्नीसह त्यांच्या घराच्या खाली असलेल्या बोगद्यात फिरताना दिसत आहे. एवढंच नाही तर त्या बोगद्यात याह्या सिनवार दीर्घ मुक्काम करण्याच्या तयारीत होता, असा दावा इस्रायलकडून करण्यात आला आहे. व्हिडीओमध्ये याह्या सिनवार आणि त्याची पत्नी काही वस्तू आणि पुरवठा घेऊन जात असल्याचे दिसत आहे. याच व्हिडीओमध्ये याह्या सिनवारच्या पत्नीकडे २७ लाख रुपये किमतीची हर्मीसची आलिशान हँडबॅग दिसून आली आहे.इस्रायली सैन्याने जारी केलेल्या व्हिडीओत ७ ऑक्टोबर २०२३ च्या हल्ल्याच्या काही तासांपूर्वी याह्या सिनवार हा लपत असल्याचे दाखवले आहे. गेल्या वर्षी ७ ऑक्टोबर रोजी इस्रायलवर मोठा प्राणघातक हल्ला झाला होता. त्या हल्ल्याच्या आधी याह्या सिनवार हा त्याच्या पत्नी आणि मुलांसह एका भूमिगत बोगद्यातून चालताना आणि नंतर आयएफडीला सापडलेल्या बंकरमध्ये काही साहित्याच्या पिशव्या घेऊन जात असल्याचे म्हटले आहे.

### हल्ल्याचा मास्टरमाईंड!

इस्रायलच्या हद्दीत गेल्या वर्षी ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासच्या दहशतवाद्यांनी गाझा पट्टीतून प्रवेश करत बेफाम कत्तल केली होती. घराघरात घुसून इस्रायली नागरिकांना ठार केलं होतं. प्रचंड दहशत निर्माण केली. रस्त्यावर मृतदेहांची जाहीर विटंबनाही केली. याह्या सिनवार हा याच हल्ल्याचा मास्टरमाईंड होता. त्यामुळे त्याचा मृत्यू हा हमाससाठी मोठा धक्का मानला जातो.

### याह्या अचानक सापडला आणि मारला गेला!

हमासचा म्होरक्या इतक्या सहज हाती लागेल याची इस्रायली लष्कराला कल्पनाही नव्हती. तो कुठे आहे याचा ठावठिकाणा लष्कराला माहिती नव्हता. त्याबाबत कोणतीही गुप्तचर यंत्रणेची माहिती लष्कराकडे नव्हती. नेहमीप्रमाणे पेट्रोलिंग करत असणाऱ्या पथकाला तो त्या घरात दिसला आणि त्याचा खात्मा करण्यात आला. पेट्रोलिंगच्या पथकाला हमासचे तीन दहशतवादी दिसले. त्यातच याह्या एक होता. चकमकीदरम्यान याह्यानं एका इमारतीमध्ये आसरा घेतला. पण तिथे इस्रायलचे ड्रोन पोहोचले आणि त्याला ठार करण्यात आलं.

# राहुरीत भव्य रक्तदान शिबिर

## उपक्रम:महावीर प्रतिष्ठानाचे सामाजिक दायित्व

राहूरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी येथील महावीर प्रतिष्ठानाचा वतीने तब्बल २१ वेळा भव्य असे रक्तदान शिबिराचे आयोजन करून समाजा प्रति आपले सामाजिक दायित्व सिध्द केले.राहुरी येथील जैन स्थानकात आयोजित भव्य रक्तदान शिबिरात आनंदऋषी ट्रस्ट बल्ड सेंटरचा अ नगरचा सहकार्याने भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले ब्लड सेंटरचे डॉ सुनील महानोर निशाद शेख आकाश बोडके सरिता मोरे मधुरा जोशी व सहकारी स्टाफ यांनी रक्तदान शिबिरासाठी सेवा दिली.

राहुरी येथील जैन स्थानकात आयोजित भव्य रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी महावीर प्रतिष्ठानाचे वैभव ओस्तवाल निलेश बोरा नयन शिंगी गिरीश अग्रवाल प्रशांत सुराणा डॉ प्रीतम चुत्तर हर्षजीत सुराणा आदीनी विशेष परिश्रम घेतले शिबिरात रक्तदान करण्यासाठी अनेक रक्तदाते स्वयंपूर्ण येऊन रक्तदान शिबिरास प्रतिसाद देत रक्तदान शिबिरा प्रसंगी गोपाळ लाहोटी आशिष मुथ्था किरण सुराणा रईस शेख पत्रकार आप्पासाहेब मकासरे मनोज औटी रवी पडघडमल आदी उपस्थित होते.महावीर प्रतिष्ठान राहुरी शहरातील सामाजिक धार्मिक उपक्रमात अग्रेसर राहुन आपले सामाजिक दायित्व देत असते त्यांचा प्रत्येक उपक्रमाचे राहुरी शहर व परिसरतुन मोठ्या प्रमाणात कौतुक व स्वागत केले जाते.



# कार्यकर्तृत्वाचा झाला यथोचित सन्मान

## निवड: विभागीय शिक्षण मंडळ सदस्यपदी सुधाकर कापरे



औरंगाबाद/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य शिक्ष्ज्ञक सेनेचे राज्य कोषाध्यक्ष ङ सुधाकर कापरे यांची महाराष्ट्र शासनाने छत्रपती संभाजीनगर विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सदस्यपदी नियुक्ती केली आहे. ङ सुधाकर कापरे हे गेल्या २४ वर्षापासून श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून कार्यरत असून संस्थेच्या नियामक मंडळावर शिक्षक प्रतिनिधी म्हणूनही निवडून आले आहेत. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेता अंबादास दानवे, शिक्षक सेनेचे अध्यक्ष आमदार ज.मो.अभ्यंकर, श्री स.भु. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ङ दिनेश वकील, सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, बोर्डाचे अध्यक्ष अनिल साबळे आदींनी या नियुक्तीबददल सुधाकर कापरे यांचे कौतूक केले आहे.

# येडेश्वरी कारखान्याकडुन सभासदांची दीवाळी गोड



केज/पुण्यभमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील येडेश्वरी अग्रो प्राडक्ट लि. आनंदगाव सारणी यांच्या वतीने दिपावली सणा निमीत्त सभासदांना साखर वाटप करण्यात येणार आहे .येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्ट लिमिटेड पवनसुतनगर आनंदगाव सारणी ता. केज यांच्या वतीने सर्व सभासदांना कळविण्यात आले आहे की,प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी दिपावली सणानिमीत्त साखर वाटप शनिवार दिनांक १९ आक्टोबर २०२४ रोजी सकाळी ठीक ९-३० वाजल्यापासून वाटप चालू झालेले आहे तरी सर्व सभासदांनी साखर लवकरात लवकर घेऊन जावी.येताना आधार कार्ड झेरॉक्स सोबतघेऊन यावी असे आवाहन येडेश्वरी अग्रो प्राडक्ट लि.पवनसुत नगर आनंदगाव सारणी यांच्या वतीने सभासदांना करण्यात आले आहे.या साठी सोनवणे एच.जी. यांच्या कडे संपर्क करावा असे आवाहन येडेश्वरी अग्रो प्राडक्टचे चेअरमन खा.बजरंग बप्पा सोनवणे व संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# प्रस्थापित लुटारु पुढारी हद्दपार

## उत्तमराव माने: नविन पर्याय समोर आणणार



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी विधानसभा निवडणुकीत प्रस्थापित व लुटारु पुढार्यांना हद्दपार करुन नविन पर्याय समोर आणण्याचा निर्धार सर्वसामान्य मतदारांनी केला असल्याचे ज्येष्ठ नेते उत्तमराव माने यांनी सांगितले.

परळी शहर व परिसरात विद्यमान सत्ताधारी पुढार्यांनी अभुतपुर्व दहशत माजवली असुन याचा सर्वसामान्य जनतेला प्रचंड त्रास होत आहे. केवळ मोठमोठ्या गप्पा व आश्वासने देणार्या या प्रस्थापित पुढार्यांनी परळी मतदार संघाचा कुठलाही विकास केला नाही. किंवा गोरगरीब तसेच तरुणांना रोजगार मिळेल यासाठी कुठलेही नविन प्रकल्प उभे केले नाहीत. सत्तेतुन पैसा व पैशातुन सत्ता मिळवणे ऐवढाचा कार्यक्रम गेल्या कांही वर्षांत पहावयास मिळत आहे. विकासाच्या नावावर प्रचंड लुट सर्रास चालु आहे. सत्तेच्या जोरावर सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणार्यांना खोट्या केसेस मध्ये अडकुन गुन्हे दाखल करुन त्रास देण्याचे काम सर्वसामान्य जनता उघड्या डोळ्याने पाहत आहे. आता हे अती झाले असुन डोक्यावुन पाणी वाहत आहे. त्यामुळे विद्यमान प्रस्थापित व लुटारु पुढार्यांना हद्दपार करण्याचा निर्णय परळी विधानसभा मतदार संघातील सर्वसामान्य जनतेने घेतला असुन या संदर्भात अनेक गुप्त बैठका होवुन परळी विधानसभेत सर्वसामान्य जनतेसाठी नविन पर्याय समोर आणुन निवडुन आणण्याचा निर्धार मतदारांनी केला असल्याचे उत्तमराव माने यांनी म्हटले आहे.

# बस स्थानकाचा स्लॅब कोसळला

## मुसळधार पावसाचा फटका

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

भरपावसात निमखेडी बस स्थानकाचा स्लॅब कोसळल्याची घटना शुक्रवारी रात्री एक वाजता घडली दरम्यान रात्रीच्यावेळ असल्याने कोणताही अनर्थ घडला नाही

सोयगाव-बनोटी रस्त्यावर असलेल्या निमखेडी फाट्यावर बस स्थानकाचा भरपावसात स्लॅब कोसळून बस स्थानक धोकादायक झाले आहे त्यामुळे शनिवारी पहाटेपासून प्रवाशांची गैरसोय झाली होती दरम्यान रात्रीची वेळ असल्याने कोणताही अनर्थ घडला नसल्याचे प्रशासन कडून स्पष्ट करण्यात आले आहे सोयगाव परिसरात शुक्रवारी रात्री अतिवृष्टी चा मुसळधार पाऊस झाला दरम्यान या वादळीपावसाने निमखेडी बस स्थानकचा स्लॅब कोसळला आहे शनिवारी महसूल कडून घटनेचा पंचनामा करून संबंधित विभागाला अहवाल पाठविण्यात आला आहे.

## निवेदन कमलाकर कोतेची कारवाईची मागणी

# शिर्डी संस्थान बद्दल आक्षेपार्ह व्हिडिओ

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी जगभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले शिर्डीचे साईबाबा यांचा बद्दल सोशल मीडिया वर आक्षेपार्ह व्हिडिओ पसारीत करून साईबाबा ची व साईबाबा संस्थानची बदनामी करणारे व्हिडिओ यु टुब वरुन हटवुन संबंधीतांनावर कारवाई करण्यासाठी शिवसेनेचे उत्तर नगर जिल्हाप्रमुख कमालकर कोते यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक अहिल्यानगर यांना समक्ष भेटून तक्रार लेखी फिर्याद दाखल केली आहे अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांच्या कडे तक्रार अर्ज दाखल करण्यात आला या वेळी कमलाकर कोते यांच्या समवेत शिर्डी येथील माजी खासदार सदाशिव लोखंडे उपस्थित होते

सी.आर.पी.सी. कलम १५४ (३) प्रमाणे श्री साईबाबा व साईबाबा संस्थान शिर्डी यांच्याबददल अक्षेपार्ह व्हिडीओ प्रसारीत केल्याबददल लेखी फिर्याद दाखल केली आहे फिर्यादीत म्हटले आहे की वरील विषयास अनुसरुन कारणे लेखी फिर्याद करतो की, मी मागील वर्षी श्री साईबाबा बददल युट्युब वर एक व्हिडीओ पाहिला सदर व्हिडीओ मध्ये जयपुर येथील प्रवक्ता गिरीधर स्वामीजी यांचे सदर व्हिडीओ मध्ये असा आक्षेपाहर्य मजकुर त्यांनी प्रवचनामध्ये मांडला त्यामुळे समक्ष साईभक्तांच्या व शिर्डी ग्रामस्थांच्या भावणा दुखवल्या आहे यामुळे मला देखील सदर व्हिडीओ पाहुन सदर गिरीधर स्वामी बददल प्रचंड व्देश निर्माण झालेला आहे. सदर गिरीधर स्वामी याने सदर व्हिडीओ हा युटयुब वर अपलोड करुन प्रसारीत केलेला आहे. सदर व्हिडीओ मधील प्रवचन मांडताना त्यांनी श्री साई सचरित्र या पवित्र ग्रंथाबददल देखील आक्षेपाहर्य चुकीचा प्रसार केलेला आहे. यासर्व कारण आमच्या प्रचंड भावणा दुखवल्या गेलेल्या आहे. सदर व्हिडीओ हा चुकीचा आहे. व श्री साईबाबा बददल व श्री साईबाबा संस्थान बददल त्यांनी ज्या पध्दतीने वक्तव्य केलेले आहे. ते कोणाच्याही बुध्दीला पटनारे नाही. त व्हिडीओ सध्या सोशल नेटवर्कीग साईटवर व्हायरल होत आहेयाकामी अनेक युटुब चॅनल टिव्ही वरील न्युज चॅनल तसेच फेसबुक पेज इन्स्टाग्रॅम पेज व व्हाटसअप ग्रुप व्दारे सदर व्हिडीओ हे शेअर केले जात आहे. तरी सदरील अक्षेपार्ह व्हिडीओबाबत यापुर्वी देखील दि. १०/०६/२०२३ रोजी लेखी तक्रार अर्ज दाखल केलेला होता, सदर तक्रार अर्जावर कोणताही निर्णय झालेला नाही. तरी सदर व्हीडीओ बाबत मी स्वतंत्र पेन्डड्रायव्ह मध्ये व्हिडीओ सोबत दिलेले आहे. याबाबतची स्वतः शहानिशा करावी व व्हिडीओ मधील मजकुर व्यक्त करणारे वक्ते तसेच व्हिडोओ शेअर करणारे संबंधीत व्यक्ती यांच्याबाबत सखोल चौकशी व्हावी सदर व्हिडीओ हे संबंधीत साईटवरुन कायम स्वरुपी डिलीट करण्यात यावे. तसेच श्री साईबाबांची विटंबना केली व धार्मीक भावणा दुखवल्या याबाबतीत व तसेच संबंधीतावर तातडीने गुन्हे दाखल होवुन कडक शासन व्हावे.



# हिंगलाजमाता मिरवणूक उत्साहात!

## अध्यात्मिक: शोभा यात्रेच्या पुष्पवृष्टी



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी शहरातील शंकर-पार्वतीनगर भागात हिंगलाजमाता देवीचे नूतन मंदिर बांधण्यात आले असून कलशारोहण सोहळा पार पडत आहे. यानिमित्ताने ढोलताशांच्या गजरात शहरात कलश मिरवणूक काढण्यात आली. भावसार समाजाच्या वतीने शंकर पार्वतीनगर परिसरात हिंगलाजमातेचे मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरास कलश बसविण्यात येणार आहे. तत्पूर्वी कलश मिरवणूक काढण्यात आली. भावसार समाजाच्या वतीने हिंगलाजमाता मंदिर, गरुड चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अग्रवाल लॉज, कृषी उत्पन्न बाजार समिती, राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक, नेहरू चौक, वैद्यनाथ मंदिर, टॉवर चौक, नेहरू चौक, वैद्यनाथ मंदिर, हिंगलाजमाता मंदिर अशी ढोलताशांच्या गजरात, टाळमृदंगाच्या निनादात मिरवणूक काढण्यात आली. कलश घेऊन महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. शोभायात्रेच्या ठिकाणी पुष्पवृष्टी करत स्वागत करण्यात आले. यावेळी भावसार समाजाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश कान्हेगावकर, वडवणीचे महेश सदरे, दत्तात्रय लांडे व शहरातील सर्व भावसार समाजातील महिलांचा सहभाग लाक्षणिक होता.

# शासनाच्या तिजोरीत पैसा परत जातोच कसा ?

**वर्तमान**

**राजेंद्र बाहेती**



जिल्हा परिषद प्रशासन, कृषी विद्यापीठ, आमदार, खासदार, आणि अन्य विभागातील अखर्चित पैसा केंद्र व राज्य शासनाच्या तिजोरीत परत जातो ही फार मोठी शोकांतिका आहे.

कारण भारतात ग्रामीण भागातील व शहरातील अनेक समस्या आहेत त्या समस्या सोडविण्यासाठी पैसा फार आवश्यक आहे आणि पैशाचे आणि जनहितार्थ योजनेचे योग्य नियोजन केले तर शासनाच्या तिजोरीत पैसा वापस जाऊ शकत नाही, कारण की भारतात इतक्या समस्या आहेत त्या सोडवण्यासाठी पैसा कमी पडू शकतो.

शासन प्रशासनमधील कर्मचारी, अधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्यात आपसात योग्य समन्वय असल्यास निधी कसा परत जाणार; परंतु यांच्यात समन्वयाचा अभाव आपसात तालमेल नसणे किंवा योजना राबवण्यासाठी दिरंगाई आणि काही वेळेस शासनाच्या तिजोरीतून उशिरा पैसा निघणे आणि पैसे उशिरा निघाल्यामुळे नियोजनाचा अभाव असल्यामुळे मार्चपर्यंत ते पैसे खर्च होत नाही आणि मार्चनंतर परत पैसा शासनाच्या तिजोरीत अशी अवस्था आहे.

आज प्रत्येक शहरात ग्रामीण भागात काही ठिकाणी रस्त्यांची इतकी दयनीय अवस्था आहे की समजत नाही. रस्त्यात खड्डा की खड्ड्याचा रस्ता. अशावेळी लोकांना वाहनधारकांना खूप त्रास सोसावा लागतो, हे शासन प्रशासनाला लोकप्रतिनिधींना दिसत नाही काय? शहरातील ग्रामीण भागातील शासन प्रशासनाच्या शाळांची काय अवस्था आहे हे कोणाकडून लपून राहिलेले आहे का? मग अशा समस्या लक्षात घेऊन त्याबाबतीत योग्य नियोजन केल्यास कशाला शासनाच्या तिजोरीत पैसा वापस जाणार.

तेव्हा शासन प्रशासनातील उच्च अधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी पैसा खर्च करण्याच्या बाबतीत योग्य नियोजन करावे व जास्तीत जास्त जनहितार्थ कार्य करून घ्यावे म्हणजे अखर्चित पैसा शासनाच्या तिजोरीत वापस जाणार नाही आणि पैसा वापस जाण्याच्या शोकांतिका प्रवृत्तीला आळा बसणार.

काही प्रकल्प योजना चालू होऊन जातात, पण पैशाअभावी त्या पूर्णत्वास लवकर जात नाही आणि पूर्णत्वास जाईपर्यंत त्या प्रकल्पाच्या बजेटमध्ये खूप वाढ होऊन जाते म्हणून पैशाचे असे योग्य नियोजन करावे जेणेकरून ते शासनाच्या तिजोरीत जाण्याऐवजी जनहितार्थ कार्यासाठी कामी आले पाहिजे. कोणतीही योजना कोणत्याही प्रकल्प वेळेवर झाले पाहिजे याबाबतीत कटाक्षाने लक्ष देण्याची गरज आहे.

## राशी-भविष्य — दि. २० ऑक्टोबर ते २६ ऑक्टोबर २४

**दिनविशेषः दि. २०ऑक्टो.**- संकष्ट चतुर्थी चं.८.०३ मि., बालाजी म. यात्रा (देऊळगावराजा), **दि.२१ ऑक्टो**- राष्ट्रसंत तुकडोजी म.पु. लाला म.पु. (कोंडोली), **दि. २२ ऑक्टो.**- शिवराम म.पु. दत्ताआश्रम केळपूर (अनगर), **दि.२४ ऑक्टो.**- कराष्टमी, गुरूपुष्यामृत योग स. ६.१५ पासून शुक्र. सं. ६.१५पर्यंत., **दि.२५ऑक्टो**-चक्रपाणी प्रभु ज. महानुभवीय, **दि.२६ ऑक्टो.** - म.पु. सिनगाव. बापुराव म. खातरखेडकर पु., झोलेबाबा पु. चिखली (अकोला)

**मेष — चंचल वृत्ती.**
आपली मनस्थिती चंचल राहील. कुठलेही निर्णय तुम्हाला घेतांना द्विधा मनस्थितीतून जावे लागेल. आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहाल. तसेच कामे करतांना एखादे काम कमी करा पण नुकसान होणार नाही. याची काळजी घ्या. घरगुती वातावरण चांगले राहील.

**वृषभ — आहारावर नियंत्रण.**
आपण आपल्या आरोग्याविषयी जागरूक असावे. आपल्या खाण्यापिण्यावर नियंत्रण ठेवा. कुणी कितीही आग्रह केला तरी तुम्ही आहारावर नियंत्रण ठेवा. कारण त्रास तुम्हालाच होईल. व्यवसायातील आवक वाढेल. क्षुल्लक कारणावरून जोडीदाराशी वाद घालू नका. संयम ठेवा.

**मिथुन — तडजोड स्वीकारा.**
तुम्हाला तुमची कामे, पूर्ण करावयाच्यी योजना कृतीत उतरावयाच्या असतील तर मार्गही सापडतील. आपली मते इतरांवर लादू नका. कामावरील आत्मविश्वास वाढेल न पटणाऱ्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले तरच त्रास होणार नाही.

**कर्क — प्रवासाला जावे लागेल.**
नोकरी/व्यवसायानिमित्त कामानिमित्त प्रवास करावा लागेल. प्रवासात किमती वस्तू सांभाळून ठेवा, हरविल्याची दाट शक्यता ग्रह सुचवित आहेत. नोकरदार वर्गाचे काम सुरळीत चालू राहील, आर्थिक व्यवहार लेखी स्वरूपातच करा, व कोणावरही अतिविश्वास ठेवू नका.

**सिंह — मोलाचे मार्गदर्शन मिळेल.**
महत्त्वाचे निर्णय घेताना तुमच्याजवळ कितीही हुशारी असली तरी या दिवसात ती उपयोगी ठरणार नाही. तुम्हाला ज्येष्ठांचे, आपल्या गुरूंचे, वडिलधाऱ्या अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन मोलाचे ठरेल. तुम्ही योग्य अचूक निर्णय घेऊ शकाल. जोडीदाराच्या आरोग्याची चिंता वाटेल, पण चिंता करण्याची गरज नाही.

**कन्या — गुंतवणूक टाळा.**
व्यवसायात गुंतवणूक करणे टाळा, सध्या नवीन व्यवसायात पैसा गुंतवू नका. नोकरी/व्यवसायातील कामे करताना दिरंगाई/आळस करू नका. सर्व गोष्टी अनुकूल असताना हातावर हात देऊन बसू नका, कामाला लागा. महिलांनी काटकसर करण्याचा थोडातरी प्रयत्न करावा. दुरवर राहणाऱ्या जवळच्या नातेवाईकाकडून आनंदाची बातमी समजेल.

**तूळ — प्रतिक्रिया देणे टाळा.**
आपल्या समोर अशा काही गोष्टी येतील ज्या तुम्हाला पटणार नाहीत. परंतु तुम्ही त्याकडे दुर्लक्ष करून प्रतिक्रिया देण्याचे टाळा. नसता वादाला/ कटीकटीला सामोरे जावे लागेल. स्वतःवर नियंत्रण ठेवा, काही निर्णय घेतांना सुचणार नाही. अशावेळी निर्णय घेणे लांबणीवर टाका. सामाजिक कामात रम रमेल.

**वृश्चिक — मनोबल वाढेल.**
काही घटना तुमचे मनोबल वाढवतील. तुमचा कामावरचा आत्मविश्वास वाढेल व आपण योग्य मार्ग निवडल्याचे समाधान वाटेल. कुटुंबातील ज्येष्ठ वाढत्या वयोमानामुळे विक्षिप्तासारखे वागतील. त्यांच्या लहरी वागण्यामुळे तुम्हाला त्रास होईल. पण त्याला काही इलाज नाही. वास्तविकता स्वीकारा. वाहन सांभाळून मर्यादित वेगाने चालवा.

**धनू — अनेक माध्यमातून यश.**
आपल्या नोकरी/व्यवसायात आपणास अनेक माध्यमातून यश/सहकार्य मिळेल. आपली अडकलेली कामे छोट्याशा ओळखीतून सहज पूर्ण होतील. व्यवसायातील ओळखीच्या माध्यमातून कामे मिळतील. आर्थिक व्यवहार पूर्ण होतील. हा सर्व व्याप सांभाळतांना आपल्या आरोग्याकडेही लक्ष द्या. धावपळ/दगदग अति होईल, त्यामुळे विश्रांती घ्या.

**मकर — वाढती सकारात्मकता ठेवा.**
आपल्या नोकरी/व्यवसायातील कामे सकारात्मक दृष्टीकोन ठेवूनच पुढे चला. भुतकाळाचा विचार न करता आपण वर्तमानात काय करावे, याचे नियोजन करून कामे करा. संयम व शांतता ठेवल्यास तुम्हाला अजिबात त्रास होणार नाही. व्यवसायातील जुनी येणे वसुल होईल.

**कुंभ — लाभदायक आठवडा.**
तुम्हाला अनेक माध्यमातून नफा मिळवून देणारा हा आठवडा ठरेल. काही अनपेक्षित कामे भेटून तुम्हाला त्याचा फायदा होईल. फेरीवाले, विक्रेते, एजंट तसेच जाहीरातीचे काम करणाऱ्यांना लाभ मिळेल. व्यवहार करताना घाई करू नका. वायफळ खर्च टाळा. स्वतः अपेक्षा इच्छा मर्यादित ठेवा.

**मीन — राजकारणातील दूर राहा.**
आपण राजकारणी व्यक्तीची संबंध कामापुरतेच ठेवा, बाकी त्यांच्यापासून दूरच राहणे योग्य ठरेल. आपण हाती घेतलेल्या उपक्रमासाठी जोडीदाराची साथ मिळेल तसेच नातेवाईकांच्या शुभेच्छा पाठीशी राहतील. मंगलकार्यानिमित्त मित्र/मैत्रिणीची भेट होईल. जुन्या गोष्टीत मन रमेल.

**||इति शुभम् भवतू||**

**अविनाश अंजनकर**
अकोला

## अन्वयार्थ

**न.मा. जोशी**
8805948951

इजरायल मध्ये लहानसा समुद्र आहे, समुद्र म्हणण्यापेक्षा फार मोठे तळे (झील) म्हणावे लागेल. अँ ऍ ('मृत सागर) त्याचे नाव आहे. या पाण्यात मिठाचे प्रमाण ३५ टक्के आहे. त्यामुळे मनुष्य या पाण्यात फुटबॉलप्रमाणे तरंगू शकतो आणि पुस्तकही वाचू शकतो. या मृत सागरात अजिबात जीवन नाही, मासे-मासोळ्या नाहीत की कोणत्याही प्रकारची वनस्पती, प्राणीसुद्धा नाहीत. मृतसागराच्या अगदी उत्तरेला गॅलली समुद्र आहे. गॅलली समुद्र आणि मृत समुद्र दोन्ही एकाच जॉर्डन नदीपासून पाणी घेतात तरीदेखील दोन्ही पूर्णतः अलग आहेत. गॅलली सागर (झील) चे वैशिष्ट्य म्हणजे तो समुद्री जीवनाने, प्राण्यांनी भरपूर आहे. सर्व प्रकारचे हिरवळ २० पेक्षा अधिक प्रकारच्या मासे आणि विविध प्रकारचे जल जीवन या समुद्रात आहे. एकच क्षेत्र, एकच पाणी, एकच पाण्याचा स्रोत तरीही एक सागर जीवन पूर्ण भरपूर आणि दुसरा पूर्णतः मृत हे कसे काय? याचे कारण जॉर्डन नदी गॅलली समुद्रातून पाण्याचा प्रवाह सतत सुरू असतो. त्यामुळे समुद्र जिवंत असतो. मात्र मृत सागरात जॉर्डन नदीचे पाणी येते पण त्याला आउटलेट नाही. जॉर्डनपासून मृतसागर पाणी घेतो पण तो कुणाला काही देत नाही. ज्यात जीवन नाही तो सागर मृत आहे. याचा मानवी जीवनात एक संदेश आहे. जीवन फक्त घेण्यासाठी नाही ते देण्यासाठीही आहे. हा गुण आपल्यात नसेल तर आपण जिवंत नव्हे तर मृत आहोत. म्हणून आम्ही गॅलली सागराप्रमाणे झाले पाहिजे. मला वाटतं देशातील साऱ्या राजकारण्यांनी गॅलली समुद्र होण्याचे ठरवले आहे. फुकटचे रेवडी वाटप हा त्याचा पुरावा. पण गॅलली समुद्र समुद्राचा स्रोत जॉर्डन नदी आहे मात्र फुकटच्या रेवडी वाटपाचा स्रोत कोणता हे राजकारणी सांगत नाहीत. या राजकारण्यांना धडा शिकवण्यासाठी महात्मा गांधींचे एक वाक्य आठवते ते मतदारांनीच लक्षात घेतले पाहिजे.

प्रख्यात हिंदी साहित्यिक कृष्णकुमार यांचे 'थँक्यू गांधी' हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. या पुस्तकात गांधींचे एक वाक्य आहे,

# होय, हीच वेळ आहे....!

**मुकाबला कांटे का है!**

झारखंड आणि महाराष्ट्रात भाजपचा बोऱ्या वाजणार ही कालपर्यंत असलेली जनाधारणा हरियाणा विधानसभा निवडणूक निकालांनी बदलवून टाकली आहे. दोन्ही राज्यात मुकाबला बरोबरीचा होणार. काट्याची टक्कर होणार. हरियाणा निवडणुकीच्या वेळी पंतप्रधान मोदी म्हणाले होते काँग्रेससाठी हरियाणाचा मध्यप्रदेश होण्याची वेळ आली आहे आणि तसेच झाले. काँग्रेसनेही धडा घेतला. राहुल गांधी यांनी आपल्या पक्षातील नेत्यांना सांगितले की, 'बघा, जमिनीवर राहा. महाराष्ट्राचा हरियाणा होणार नाही हे बघा'. अर्थ सरळ आहे. मुकाबला कांटे का है!



'मला माहित आहे की ही वेळ आमची नाही'. सध्या विरोधी पक्षांना कदाचित वाटत असेल की ही वेळ आमची नाही'. पण मतदारांसाठी आणि लोकशाही न्याय स्वातंत्र्य समता बंधुता आणि न्याय या मूल्यांमध्ये विश्वास असणाऱ्या सर्वांसाठी 'हीच वेळ आहे' हे लक्षात घेण्याची गरज आहे.

आता महाराष्ट्र व झारखंड विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. निवडणुकीचा मध्यवर्ती मुद्दा कोणता आहे, असे विचारले तर उत्तर मिळेल, मुक्तहस्ते फुकटचे रेवडी वाटप. आश्चर्य तर हे आहे की भाजप आणि नरेंद्र मोदी ज्या रेवडी संस्कृतीला देशासाठी घातक आणि अर्थव्यवस्थेचा बट्ट्याबोळ करणारी मानतात त्याच मोदींचा भाजपा फुकटच्या रेवडीची लय लूट करीत आहे.

अलीकडेच महाराष्ट्रात भाजपा, एकनाथ शिंदे अजित पवार यांच्या महायुती आणि झारखंडमध्ये हेमंत सोरेन यांच्या झामुमो सरकारने महिलांना रोख रक्कम देण्यासाठी लाडकी बहीणप्रमाणे 'मुख्यमंत्री मैय्या सन्मान योजना' सुरू केली, ज्यामध्ये महिलांना अनुक्रमे दरमहा पंधराशे आणि एक हजार रुपये दिले जात आहेत, तर भाजपने झारखंडमध्ये गोगो दीदी योजना जाहीर केली, ज्यामध्ये सरकार स्थापन झाल्यास प्रत्येक महिलांना मदत होईल. दरमहा २१०० रुपये दिले जातील. म्हणजे हेमंत सरकार जे देईल ते दुप्पट. योजनेवर दरवर्षी ६५ हजार कोटी रु. खर्च होणार आहेत. याशिवाय अनेक गोष्टी मोफत देण्याची घोषणाही दोन्ही सरकारांनी केली आहे. फुकटच्या रेवड्यांनी व्यवस्थेचा बट्ट्याबोळ तर होणारच पण विकासही अवैध होणार. भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी घरचा आहेर दिला आहे. त्यांनी म्हटले आहे की या योजनेवरील अनुदान इतके जास्त आहे की इतर योजनांसाठी अनुदानाचे पैसे वेळेवर मिळतील की नाही हे निश्चित नाही. महाराष्ट्र आणि झारखंड दोन्ही सरकारांच्या विरुद्ध अँटी इन्कमबन्सी आहे. कोणतेच सरकार उत्पन्नाचे स्रोत उघड करत नाहीत. महसूल वाढवण्याच्या उपाययोजनांवर , पायाभूत सुविधांच्या विकासावर चर्चा होत नाही. लोकांच्या जीवनात गुणात्मक बदल घडवून आणण्याच्या चर्चा पडद्याआड गेल्या आहेत. आता फक्त फुकटच्या रेवडीचीच चर्चा आहे. पगार आणि पेन्शन देण्यासाठी सरकार पुरेसे नाही. सरकारने विहित मर्यादेपेक्षा खूप जास्त कर्ज घेतले आहे आणि त्यांच्या महसुलाचा मोठा हिस्सा कर्जावरील व्याजाची परतफेड करणार आहे. मात्र पक्षांना याची पर्वा नाही. त्यानंतर काहीही झाले तरी त्यांना सत्तेत यावेच लागेल. निवडणुका जिंकणे हे राजकारणाचे अंतिम ध्येय बनले आहे. वाईट तर याचे वाटते की राजकारण्यांसाठी

सत्ता सर्वोच्च असल्याने त्यांना कशाचीच पर्वा नाही मात्र त्याहून आश्चर्याची बाब म्हणजे सर्वसामान्य नागरिकांची बुद्धी भ्रष्ट झाली की काय असे वाटत आहे. पायाभूत सुविधांचा विकास नाही, भीषण महागाई आणि बेकारीने कळस गाठला ,शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था, आणि गरिबी असूनही ते फुकटच्या रेवडीच्या जाळयात अडकले आहेत. सरकार त्यांचे रक्त शोषत आहे हे त्यांना समजत नाही. स्वच्छ रक्तदान करताना स्वयंसेवी संस्था आणि रुग्णालये ज्या प्रकारे रक्तदात्याला ज्यूसचे पॅक देतात.

तसेच सरकार विविध प्रकारच्या करांच्या माध्यमातून लोकांचे खिसे रिकामे करत आहेत, त्यांचे रक्त वाहून घेत आहेत आणि त्या बदल्यात ते ज्यूसचे पॅक म्हणजेच मोफत रेवडी देत आहेत. रक्तदान केल्यानंतर शरीरात पुन्हा रक्त तयार होते, पण रेवडी संस्कृतीने अशा लोकांचे उत्पन्न वाढत नाही. जोपर्यंत लोक त्यांचे व्यापक आणि दूरगामी हित लक्षात घेऊन मतदान करत नाहीत, तोपर्यंत राजकीय पक्ष त्यांची मते घेत राहतील आणि फुकटच्या पैशाच्या नावाखाली त्यांचे शोषण करत राहतील. शिंदे यांच्यासाठी हीच वेळ आहे पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळविण्याची, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या कुबड्या फेकून देऊन स्वबळावर सत्ता स्थापन करण्याची भाजपासाठी हीच वेळ आहे. एकमेकापासून दूर झालेले नेते म्हणत असतील की 'कौन चाहता है भला अपनों से दूर रहना, लेकिन वक्त की मजबुरी है'. ही मजबूरी दूर करण्याची त्यांच्याहीसाठी 'हीच वेळ आहे'. जनतेच्या समस्या चहाट्यावर आणण्यासाठी माध्यम जगतातील पत्रकार आणि इतर घटकांवर जबाबदारी पेलण्याची 'हीच वेळ आहे'.

आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आहोत कुणाचीही 'बी टीम' नाही हे सिद्ध करण्याची ॲड. प्रकाश आंबेडकरांसाठी 'हीच वेळ आहे'. पुरोगामी महाराष्ट्रात काँग्रेस आघाडीवर राहील हे सिद्ध करण्याची नानाभाऊ पटोलेंसाठीही 'हीच वेळ आहे'. शेवटी सर्वसामान्य जनतेसाठी सर्वात महत्त्वाचे म्हणजे लालूच दाखवून मत विकत घेणाऱ्या व आपले शोषण करणाऱ्या 'रेवडीछाप' राजकारण्यांना धडा शिकवण्याची 'हीच वेळ आहे.'

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक असून राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य आणि ज्येष्ठ पत्रकार आहेत.)
यवतमाळ.

# भारत-मालदीव संबंधातील चढ-उतार!

१९६५ मध्ये मालदीवला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशासोबत राजनयिक संबंध प्रस्थापित करणारा भारत पहिला देश होता. या दोन्ही देशांमध्ये राजनयिक संबंधांची औपचारिक सुरुवात १९७० पासून झाली. मालदीव १९८२ मध्ये राष्ट्रकुल संघटनेत सहभागी झाला. पर्यावरण, दहशतवादाचे उच्चाटन, निशस्त्रीकरण, संरक्षण, मानवाधिकारांचे संरक्षण व संवर्धनासंबंधीच्या करारांमध्ये मालदीव सहभागी आहे. भारताने सर्वच क्षेत्रात मालदीवला भरीव मदत केली.

**भाष्य**

**प्रा. डॉ. विनोद गायकवाड**
9850324202

मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुइज्जू यांनी नुकताच भारत दौरा केला. गेल्या काही महिन्यांपासून दोन्ही देशातील तणावपूर्ण असलेले संबंध सुरळीत होण्यास या दौऱ्याने हातभार लागेल. भारत-मालदीव संबंध जुने असून भारत मालदीवचा सर्वात जवळचा आणि सुरुवातीपासून मित्र आहे. १९८५ मध्ये स्थापन झालेल्या सार्क संघटनेचा मालदीव संस्थापक सदस्य असल्याने भारत-मालदीव संबंध सलोख्याचे राहिलेत. मालदीवमधील राजकीय अस्थिरतेच्या काळात भारताने महत्त्वाची भूमिका पार पाडली.

१९६५ मध्ये मालदीवला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशासोबत राजनयिक संबंध प्रस्थापित करणारा भारत पहिला देश होता. या दोन्ही देशांमध्ये राजनयिक संबंधांची औपचारिक सुरुवात १९७० पासून झाली. मालदीव १९८२ मध्ये राष्ट्रकुल संघटनेत सहभागी झाला. पर्यावरण, दहशतवादाचे उच्चाटन, निशस्त्रीकरण, संरक्षण, मानवाधिकारांचे संरक्षण व संवर्धनासंबंधीच्या करारांमध्ये मालदीव सहभागी आहे. भारताने सर्वच क्षेत्रात मालदीवला भरीव मदत केली.

पायाभूत विकासासाठी भारताने मालदीवला सुरुवातीपासूनच सातत्यपूर्ण मदत केली. १९८६ मध्ये मेडिकल कॉम्प्लेक्सच्या निर्मितीसाठी भारताने ४२५ दशलक्ष रुपयाची आर्थिक मदत दिली. माले येथे इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटल अत्याधुनिक दर्जाच्या सोयी-सुविधा युक्त आहे. या हॉस्पिटलच्या दुरुस्तीसाठी २०११ मध्ये ३७२.४ दशलक्ष रुपयांची मालदीवला भरीव मदत केली. त्यानंतर १९९६ मध्ये अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखा माले येथे स्थापन केली. २००० मध्ये सुरक्षितता व आरोग्य याबाबत दोन्ही देशात करार झाला.

१९८८ मध्ये मालदीवला अस्थिर करण्याचा प्रयत्न झाला. पिपल्स लिबरेशन ऑर्गनायझेशन ऑफ तामिळ ईलम (प्लोटे) या संघटनेने सैनिकी मोहीम आखून अब्दुल्ला लुतुफी यांनी आपल्या सहयोगी ८० बंदूकदारांच्या मदतीने अस्थिरता निर्माण केल्याने मालदीव सरकार अडचणीत आले होते. मालदीव सरकारने भारत सरकारला लष्करी मदतीची मागणी केल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी १६०० सैनिकांची कुमक मालदीवला पाठविली. लुतुफी मोहीम मोडून काढण्यात भारतीय लष्करातील ब्रिगेडियर एफएफसी बलसारा यांनी भारतीय सैन्यांसह महत्त्वाची कामगिरी करून निर्णायक विजय मिळविला. ऑपरेशन संध्याने मालदीवला केलेली लष्करी मदत दोन्ही देशातील द्विपक्षीय संबंध अधिक बळकट होण्यासाठी उपयुक्त ठरली. त्यानंतर दोन्ही देशात अनेक सुरक्षा करार झालेत. महासागरी क्षेत्र व त्याच्या सुरक्षिततेसाठी भारताने पर्याप्त मदत केली. समुद्रकिनाऱ्यावरील पाण्याच्या रक्षणासाठी भारताने दुर्गतीची व २६० टनाची नौका मालदीवला दिली. मालदीवच्या सर्व सव्वीस कंकणाकृती बेटांवर नवीन रडार यंत्रणा उभारली, त्याकरिता दोन हेलिकॉप्टर दिले. डिसेंबर २००४ मध्ये त्सुनामी ही नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर मालदीवला मदत करणाऱ्या देशांमध्ये भारताचा पहिला क्रमांक होता. यावेळी ३६३.१ दशलक्ष रुपयाची आर्थिक मदत केली. २००५ ते २००७ या पाच वर्षांमध्ये विकास सहकार्यासाठी भारतीय अर्थसंकल्पाच्या सरासरी ५२ टक्के इतकी मदत दिली. दोन्ही देशात मोठ्या प्रमाणात आयात-निर्यात चालते. फेब्रुवारी १९८६ मध्ये दोन्ही देशांनी मिळून आर्थिक व तांत्रिक सहकार्यासाठी आयोग स्थापन केला. यामुळे दोन्ही देशातील व्यापार वाढला. १९९९-२००० मध्ये द्विपक्षीय व्यापार ३३३ दशलक्ष रुपये तर २०११-१२ मध्ये तो ७ अब्ज रुपये होता. त्यानंतर प्रत्येक वर्षी दोन्ही देशांमधील आयात-निर्यात वाढतच गेली.

तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, मनमोहनसिंग यांनी मालदीवला आर्थिक स्थिरता देण्याचे प्रयत्न केले. त्याला मालदीवचे तत्कालीन राष्ट्रपती मोहम्मद वहीद, मोहम्मद नशीद व अब्दुल्ला यामीन अब्दुल गयूम इत्यादींनी प्रतिसाद दिला. तत्कालीन राष्ट्रपती मोहम्मद वहिद यांच्या काळात द्विपक्षीय संबंधात थोडे वितुष्ट आले, कारण भारतातील जी.एम.आर. ग्रुपकडे लिजवर देण्यासंबंधीचा केलेला करार मालदीव सरकारने रद्द केला होता.

भारताच्या आयात-निर्यातीसाठी मालदीव महत्त्वाचे केंद्र असल्याने १९७६ मध्ये या दोन्ही देशातील सागरी सीमा निश्चित केल्या गेल्या. संबंधित सीमारेषेला दळण-वळणाची निर्णायक सीमारेषा म्हणून ओळखली जाते. भारतीय महासागर क्षेत्रात चीनच्या वाढत्या हितसंबंधांमुळे भारत अधिक जागरूक झाला. विशेष म्हणजे २००६ मध्ये चीनला नाविक तळासाठी जागा देण्यासंबंधी मालदीव विचार करीत असल्याचे समजल्यानंतर भारताने सागरी क्षेत्राची सुरक्षा वाढविली. मालदीवसाठी या क्षेत्रातील सर्व देश महत्त्वपूर्ण असल्याचा उल्लेख तत्कालीन राष्ट्रपती अब्दुल्ला यमीन यांनी केल्याने भारतविषयक दृष्टिकोनामध्ये अंतर पडत असल्याचे जाणवले. इथूनच मालदीव-चीन जवळीक वाढायला सुरुवात झाली. मुइज्जू यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीयांविरुद्ध वापरलेले राजकीय शब्द हे वादाचे नवे कारण ठरले. विशेष म्हणजे राष्ट्राध्यक्ष मुइज्जू यांच्या नेतृत्वाखालील नवीन सरकारने भारताने दिलेले डॉर्नियर विमान आणि हेलिकॉप्टर चालवण्यासाठी जबाबदार असलेले ८८ लष्करी कर्मचारी मागे घेण्यास कळविले. तसेच २०१९ चा जलसर्वेक्षण कराराही रद्द केला. पहिल्या प्रदेश दौऱ्यासाठी त्यांनी चीनची निवड केल्याने हे सरकार चीनकडे झुकणार हे स्पष्ट झाले. मुइज्जू यांनी राष्ट्राध्यक्षपदाची सूत्र स्वीकारल्यानंतर नाजूक अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी मदत केल्याने भारताचे आभार मानले. मात्र, भारत आणि चीनला एका रेषेत आणले. त्यांच्या सरकारची चीन सोबत वाढती निकटता भारताच्या दृष्टीने अडचणीची ठरते आहे.

भारताला मालदीव सोबतचे आपले दीर्घकालीन संबंध नष्ट करावयाचे नाहीत म्हणूनच २०२२-२३ मध्ये १८३.१६ कोटी तर २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात ७७०.९० कोटी रुपये मदत म्हणून मंजूर करण्यात आली. अशी आर्थिक मदत केल्यानंतरही मालदीव सरकारमधील एक मंत्री पंतप्रधान मोदींवर टीका करतो. यामागे डोके कोणाचे? चीन आणि मालदीवमध्ये झालेल्या करारानुसार दोन्ही पक्ष आपापल्या मूळ हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा राखण्यासाठी तसेच राष्ट्रीय सार्वभौमत्वासाठी मालदीवच्या प्रकरणांमध्ये बाह्य हस्तक्षेपाला कठोरपणे विरोध करण्यासाठी तसेच एकमेकांना भक्कम पाठिंबा देण्यासाठी वचनबद्ध आहेत. अशा प्रकारचा करार म्हणजे भारताला एक इशाराच आहे.

अशा तणावाच्या परिस्थितीत राष्ट्राध्यक्ष मुइज्जू यांनी केलेला भारत दौरा भारतासोबतचे संबंध सुधारण्यास मदत करणारा ठरेल. या दौऱ्यात राष्ट्राध्यक्षांनी आमच्या नवीन सर्वसमावेशक व्हिजन डॉक्युमेंटमध्ये विकास, सागरी सुरक्षा, व्यापार भागीदारी, ऊर्जाप्रकल्प, आरोग्य इत्यादींचा समावेश असल्याची ग्वाही दिली. भारत-मालदीव मुक्त व्यापार करारावरदेखील चर्चा सुरू असल्याचे स्पष्ट केले. इतकेच नव्हे तर त्यांनी पंतप्रधान मोदींना मालदीव भेटीसाठी आमंत्रित केले. भारताची सुरक्षा कमकुवत करण्यासाठी ते काही करणार नाहीत आणि ते दिल्लीला एक मौल्यवान मित्र मानतात, असे आश्वासन मुइज्जू यांनी दिले. अशा त्यांच्या सहकार्याच्या भूमिकेची यशस्विता काळच ठरवेल.

(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)

**कवडसा**


# 'व्याकुळ, पण कसं...?'

**प्रा.डॉ.मोहन खडसे**
9823289010

माणूस एखाद्या गोष्टीसाठी व्याकुळ होतो म्हणजे काय तर तो त्याच्या भावनेच्या, निर्मळ, अभौतिक इच्छेच्या आड येणाऱ्या सगळया प्रकारच्या त्रासांना, अडचणींना सहन करतो. मग तो त्रास शरीराचा असो की मनाचा, माणूस सहन करतोच कारण त्यांचे मन व्याकुळ झालेले असते. काही विशेष मिळविण्यासाठी त्रासही विशेष सहन करावा लागतो, हे ज्यांना चांगलेच माहित असते तेच व्याकुळ होऊ शकतात.

एखाद्या गोष्टीसाठी माणूस व्याकूळ झाला म्हणजे त्याची सर्व प्रकारची शक्ती ही त्या गोष्टीसाठी एकवटते. व्याकुळ म्हणजे तन-मन- धनाने माणूस त्या गोष्टीसाठी प्रयत्न करत असतो. मग ते परमेश्वर असो की एखादी दुसरी कोणती गोष्ट. मात्र माणसाला ते मिळवण्यासाठी प्रयत्नही करावेच लागतात मनापासून, अगदी मनापासून! आनंद आणि समाधानासाठी माणूस करत असलेल्या प्रयत्नांमध्ये त्याची व्याकुळता जर या दोन गोष्टींसाठी असेल तर त्या दोन गोष्टी त्याला मिळण्याची शक्यता ही असतेच. हरवलेल्या, नजरेआड झालेल्या आपल्या लहान बाळाला पुन्हा पाहण्यासाठी, जवळ घेण्यासाठी, भेटण्यासाठी, आई व्याकुळ होते. याचा अर्थ असा की तिला त्या बाळाच्या शिवाय आणखी अमुक महाग वस्तू देतो, असं म्हटलं तर ती तयार होत नाही म्हणजे तिच्या व्याकुळ होण्यात प्रामाणिकपणा असतो. खरं म्हणजे स्वतःप्रति प्रामाणिकपणा हे प्रत्येक ठिकाणी आवश्यक आहे. एकजण बोलताना नेहमी म्हणत असे - 'मी तुमच्याशी प्रामाणिक आहे किंवा नाही हे मला माहीत नाही मात्र मी माझ्याशी म्हणजे स्वतःशी पूर्णपणे प्रामाणिक आहे कारण मी इतरांशी खोटं बोलू शकतो. स्वतःशी खोटं बोलणं अशक्य आहे! एखाद्याला इतरांशी खोटं बोलता येईल मात्र स्वतःशीच खोटं कसं बोलणार?' एखादी गोष्ट अशक्य असली म्हणजे माणूस ती करत नाही असं नाही तर ती त्याला करायची इच्छा नसते. ती त्याची प्रवृत्ती नसते म्हणून तो करत नाही हेच खरं.

एकदा एक राजा त्याच्या महालाच्या छतावर सहज फिरत असताना त्याला दिसले की काही साधू त्यांच्यातच गुंग असेलेले रस्त्याने जात आहेत. ते खूप आनंदात होते कारण त्यांच्या मनात कोणाबद्दल राग किंवा द्वेष नव्हता. या संतांचे गुंग होणे पाहून राजाला त्यांना भेटायची इच्छा झाली आणि त्यांनी तत्काळ त्या दोन्ही संतांना तत्काळ उपस्थित करण्याचे आदेश दिले. सैनिकांनी राजाच्या देशाचे पालन करीत त्या दोघांनाही तत्काळ पकडून आणून राजासमोर उपस्थित केले. संतांनी राजाला विचारले, 'आम्हाला का पकडून आणले ते सांगा. 'राजा म्हणाला, 'तुम्हाला भेटण्याची मला तीव्र इच्छा झाली म्हणून मी तुम्हाला पकडून



आणण्याचा आदेश दिला. खरं तर मी तुम्हा दोघांना आनंदात गुंग पाहताच तुम्हाला भेटायला व्याकुळ झालो, अगदी मनापासून!' संत म्हणाले, 'असेच व्याकुळ जर परमेश्वरासाठी किंवा आणखी कोणत्याही निखळ, अभौतिक आनंदासाठी झालात तर तुम्हाला ते मिळू शकेल...'

माणूस एखाद्या गोष्टीसाठी व्याकुळ होतो म्हणजे काय तर तो त्याच्या भावनेच्या, निर्मळ, अभौतिक इच्छेच्या आड येणाऱ्या सगळया प्रकारच्या त्रासांना, अडचणींना सहन करतो. मग तो त्रास शरीराचा असो की मनाचा, माणूस सहन करतोच कारण त्यांचे मन व्याकुळ झालेले असते. काही विशेष मिळविण्यासाठी त्रासही विशेष सहन करावा लागतो, हे ज्यांना चांगलेच माहित असते तेच व्याकुळ होऊ शकतात. यासाठीच की काय प्रसिद्ध शायर माहूर देहलवी म्हणतात -

**हर इक दागे-तमन्ना को**
**कलेजे से लगाता हूं**
**कि घर आई हुई दौलत को**
**ठुकराया नहीं जाता**

खरं म्हणजे सहनशीलता माणसात कमीच असते मात्र तो व्याकुळ झाला म्हणजे ती वाढते, एवढं नक्की! पंढरपूरच्या काही खडतर वाटेवरून आनंदात जाणाऱ्या वारकऱ्यांना विठ्ठल दर्शनाची आस असते, ते दर्शनासाठी व्याकुळ असतात म्हणूनच ते उन, वारा, पाऊस सहन करतात - आनंदाने ! श्रद्धेपोटी विठोबाच्या दर्शनासाठी व्याकुळ असल्यानेच त्यांचीच मने त्यांना बळ देतात. प्रश्न अन् समस्यांना तोंड देताना माणसाला असंच व्याकुळ होता आलं तर किती बरं होऊ शकते, यात शंकाच ती काय ?

( प्रस्तुत लेखक हे प्रसिद्ध स्तंभ लेखक, शिक्षण तज्ज्ञ असून त्यांच्या 'सावित्री फाऊंडेशन, अकोला' च्या माध्यमातून सक्रिय सामाजिक, शैक्षणिक कार्य करतात. ) अकोला
ईमेल: mvkhadse9@gmail.com

# राहुल गांधींबद्दल अपमानास्पद विधान करणे भाजपला भोवले



**बेंगळुरू :** कर्नाटकातील भाजपचे आमदार बसनगौडा पाटील यतनाल यांच्यावर एका वक्तव्यावरून एफआयआर दाखल करण्यात आला आहे. त्यांनी एका जाहीर सभेत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि कर्नाटकचे मंत्री बीझेड जमीर अहमद खान यांच्या विरोधात अपमानास्पद टिप्पणी केल्याचा आरोप आहे.

काँग्रेसचे नगराध्यक्ष परशुराम होसमनी यांच्या तक्रारीवरून त्यांच्याविरुद्ध गांधी चौक पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. अपमान करणे, शांतता भंग करणे आणि दिशाभूल करणारी माहिती पसरवणे या प्रकरणी बसनगौडा पाटील यत्नल यांच्याविरोधात गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाजप आमदार बसनगौडा पाटील यत्नल यांनी काँग्रेस नेत्यावर अपमानास्पद वक्तव्य करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही त्यांनी अशी वक्तव्य केली आहेत. बसनगौडा पाटील यत्नल म्हणाले होते की, त्यांच्या पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याने राज्यातील काँग्रेस सरकार पाडण्यासाठी १,००० कोटी रुपये बाजूला ठेवले आहेत. मात्र, या नेत्याचे नाव त्यांनी उघड केले नाही. कर्नाटक प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस एस मनोहर यांच्या तक्रारीच्या आधारे, हाय ग्राउंड्स पोलिसांनी भारतीय न्यायिक संहितेच्या कलम १९२ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# कर भरण्यात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर!

वृत्तसंस्था


**केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाची आकडेवारी**




**नवी दिल्ली:** सीबीडीटीने प्रत्यक्ष कर संकलनासंदर्भात टाइम सीरिज डेटा जारी केला आहे. या आकडेवारीनुसार, २०२३-२४ या आर्थिक वर्षात सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून १९.६२ लाख कोटी रुपयांचा प्रत्यक्ष कर जमा झाला. यामध्ये सर्वात जास्त योगदान महाराष्ट्राचे आहे. या आर्थिक वर्षात महाराष्ट्रातून ७,६१,७१६.३० कोटी रुपये (७.६२ लाख कोटी रुपये) थेट कर आला आहे. म्हणजे एकूण प्रत्यक्ष कर संकलनात एकट्या महाराष्ट्राचा वाटा ३९ टक्के आहे. उत्तर प्रदेशपेक्षा महाराष्ट्र थेट कर म्हणून सरकारी तिजोरीत १५ पट अधिक कर आणतो. उत्तर प्रदेश हे लोकसंख्येच्या बाबतीत देशातील सर्वात मोठे राज्य असले तरी प्रत्यक्ष कर संकलनाच्या बाबतीत ते देशातील इतर राज्यांपेक्षा खूपच मागे आहे. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (CBDT) जारी केलेल्या कर संकलन आकडेवारीनुसार, उत्तर प्रदेशने २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण प्रत्यक्ष कर संकलनात केवळ ४८,३३३.४४ कोटी रुपयांचे योगदान दिले आहे. तर लोकसंख्येच्या दृष्टीने देशातील दुसरे सर्वात मोठे राज्य असलेल्या बिहारचे एकूण प्रत्यक्ष कर संकलन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ६६९२.७३ कोटी रुपये झाले आहे. हे आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी ६८४५.३२ कोटी रुपयांपेक्षा कमी आहे. प्रत्यक्ष कर भरण्याच्या बाबतीत महाराष्ट्रानंतर कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर आहे. कर्नाटकने २०२३-२४ या आर्थिक वर्षात २.३५ लाख कोटी रुपये थेट कर भरले आहेत. तिसऱ्या क्रमांकावर दिल्ली आहे, ज्याने थेट कर म्हणून तिजोरीत २.०३ लाख कोटी रुपयांचे योगदान दिले आहे. तमिळनाडू चौथ्या स्थानावर आहे, ज्याने २०२३-२४ या आर्थिक वर्षात थेट कर म्हणून १.२७ लाख कोटी रुपये भरले आहेत. गुजरात ९३,३०० कोटी रुपयांच्या योगदानासह पाचव्या आणि तेलंगणा ८४,४३९ कोटी रुपयांच्या वसुलीसह सहाव्या स्थानावर आहे. यानंतर हरियाणा सातव्या क्रमांकावर आहे. हरियाणाने प्रत्यक्ष कर म्हणून ७०,९४७.३१ कोटी रुपयांचे योगदान दिले आहे.

# भारतातील दहशतवादी कारवायांमध्ये कॅनडाच्या अधिकाऱ्याचे नाव

वृत्तसंस्था



**नवी दिल्ली:** भारत आणि कॅनडा यांच्यातील तणाव सातत्याने वाढत आहे. संबंध बिघडत असताना दिल्लीने कॅनडाच्या बॉर्डर सर्व्हिस एजन्सीच्या अधिकाऱ्याचे नाव पळून गेलेल्या दहशतवाद्यांच्या यादीत समाविष्ट केले आहे. भारताला या यादीत समाविष्ट दहशतवाद्यांना कॅनडातून हद्दपार करायचे आहे.

समोर आलेली माहितीनुसार, प्रतिबंधित इंटरनॅशनल शीख युथ फेडरेशन (घ्एभ्इ) चे सदस्य आणि ण्ँेंं मध्ये सेवारत संदीपसिंग सिद्धू यांचा पंजाबमधील दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन देण्याच्या आरोपाखाली यादीत समावेश करण्यात आला आहे. २०२० मध्ये बलविंदरसिंग संधूची हत्या करण्यासाठी सिद्धू पाकिस्तानस्थित खलिस्तानी दहशतवादी लखबीरसिंग रोडे तसेच इतर आयएसआय कार्यकर्त्यांच्या संपर्कात होता. संधू खलिस्तानी दहशतवाद्यांविरुद्ध लढण्यासाठी ओळखले जात होते. फुटीरतावादी चळवळीत ते प्रतिकाराचे प्रतीक बनले. संधू यांना त्यांच्या शौर्याबद्दल शौर्य चक्रानेही सन्मानित करण्यात आले होते. शीख फॉर जस्टिस (एइ) तर्फे अमेरिका आणि कॅनडात खलिस्तानी सार्वमताला विरोध करण्यासाठीही त्यांची ओळख होती. एका वृत्तानुसार, संदीपसिंग सिद्धू यांना कथितरित्या ण्ँेंं मध्ये अधीक्षक पदावर बढती देण्यात आली होती. नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सीने (एनआयए) सांगितले की, कॅनडाचा खलिस्तानी ऑपरेटिव्ह सनी टोरंटो आणि पाकिस्तानी दहशतवादी लखबीर सिंग उर्फ रोडे संधू हे या हत्येचे सूत्रधार आहेत. मात्र, संदीपसिंग सिद्धूचे दुसरे नाव सनी टोरंटो आहे की नाही हे अद्याप समजू शकलेले नाही.

# पाकिस्तानात विद्यार्थ्यांचे आंदोलन

## शैक्षणिक संस्था तीन दिवस बंद



**लाहोर :** पंजाब प्रांतात लाहोरमधील पंजाब कॉलेज फॉर वुमनमध्ये एका विद्यार्थिनीवर सुरक्षा रक्षकाने बलात्कार केल्याचा आरोप आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी तीव्र आंदोलन सुरू केले असून पंजाब सरकारने प्रांतातील सर्व शैक्षणिक संस्था तीन दिवसांसाठी बंद केल्या आहेत आणि ६०० हून अधिक विद्यार्थ्यांना अटक केली आहे.

विद्यार्थ्यांची निदर्शने आणि तुरुंगात असलेले माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पक्षाने निदर्शने करण्याचे आवाहन या दोन्हीवर नियंत्रण आणण्यासाठी सरकारने सर्व प्रकारच्या सार्वजनिक मेळाव्यावर बंदी घातली आहे. अटक केलेल्या अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांकडून हमीपत्र घेतल्यानंतर सोडण्यात आले आहे, असे पंजाब पोलिसांच्या प्रवक्त्याने सांगितले. दुसरीकडे, पोलिसांनी विद्यार्थ्यांवर बळाचा वापर केला आणि डझनभर विद्यार्थी जखमी झाले. सरकार आणि पोलीस विद्यार्थ्यांशी कठोर गुन्हेगारांसारखी वागणूक देत आहेत, असे पालकांनी सांगितले. विद्यार्थिनीवर झालेल्या बलात्काराचे वृत्त सोशल मीडियावर प्रसिद्ध झाल्यानंतर सोमवारपासून विद्यार्थ्यांचे तीव्र आंदोलन सुरू झाले आहे. निदर्शनांमध्ये किमान ५० विद्यार्थी जखमी झाले आहेत,

# शाळेची बस खड्ड्यात पडल्याने अनेक मुले जखमी

वृत्तसंस्था

**पंचकुला :** पंचकुलाच्या मोरनी भागात टिक्कर तालाकडे जाणाऱ्या नानकाना साहिब पब्लिक स्कूलच्या बसला अपघात झाला. मुलांनी भरलेली ही बस अचानक नियंत्रणाबाहेर जाऊन खड्ड्यात पडली, त्यामुळे अनेक मुले जखमी झाली. सर्व जखमी मुलांना तातडीने उपचारासाठी सेक्टर ६ च्या रुग्णालयात नेण्यात येत आहे. घटनास्थळी बचावकार्य सुरू आहे. एका बसमध्ये ५५ मुली आणि दुसऱ्या बसमध्ये ४५ मुले होती. मुलांनी भरलेल्या बसचे नियंत्रण सुटले आणि ती खड्ड्यात पडली, त्यात चालकासह १४ मुले गंभीर जखमी झाली. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास बस मोरनी येथील टिककरताल परिसरात आली असता चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस सुमारे १०० फूट खाली खड्ड्यात पडली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले.



- ईडीचा 'पीएफआय' संदर्भात खुलासा
- आखाती देशांत केले नियोजन

# भारतात गृहयुद्ध भडकवण्याचा कट?

**नवी दिल्ली :** प्रतिबंधित संघटना पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) बाबत अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठा खुलासा केला आहे. ईडीच्या तपासात पीएफआयचे परदेशात मोठे नेटवर्क असल्याचे समोर आले आहे. सिंगापूर आणि आखाती देशांमध्ये पीएफआयचे १३ हजारांहून अधिक सक्रिय सदस्य आहेत. या देशांमध्ये पैसे गोळा करण्यासाठी पीएफआयने एक समिती स्थापन केली आहे, जी पैसे गोळा करून हवालाच्या माध्यमाने भारतात पाठवते. येथे हा पैसा दहशतवादी आणि इतर बेकायदेशीर कामांमध्ये वापरला जातो. जिहादच्या माध्यमातून भारतात इस्लामिक राज्य स्थापन करणे हे पीएफआयचे खरे उद्दिष्ट आहे.

मनी लॉंड्रिंग प्रकरणात सुरू असलेल्या तपासात ईडीने आतापर्यंत ९४ कोटी रुपयांच्या गुन्ह्याशी संबंधित मालमत्ता शोधून काढल्या आहेत. तीन वर्षांत अंमलबजावणी संचालनालयाने पीएफआयशी संबंधित २६ जणांना अटक केली आहे. दरम्यान, पीएफआय या प्रतिबंधित संघटनेबाबत आता ईडीने मोठा खुलासा केला आहे. ईडीच्या तपासात असे समोर आले आहे की, पीएफआयचे तब्बल १३ हजार सक्रिय सदस्य अजूनही परदेशात आहेत. गेल्या तीन दिवसांत केलेल्या धडक कारवाईत अंमलबजावणी संचालनालयाने पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (इइघ) च्या ३५ जंगम आणि स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. या मालमत्तांची किंमत सुमारे ५७ कोटी रुपये आहे. या मालमत्तांमध्ये अनेक ट्रस्ट, कंपन्या आणि खाजगी मालमत्तांचाही समावेश आहे.

## हवाई हल्ले आणि गनिमी युद्धाचे नियोजन

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) त्यांच्या तपासणीत आढळले की पीएफआय भारतात गृहयुद्ध छेडण्यासाठी हवाई हल्ले आणि गनिमी युद्ध करण्यासाठी स्वतंत्र दूरसंचार यंत्रणा तयार करण्याचा विचार करत आहे. दिल्ली पोलीस आणि एनआयएने नोंदवलेल्या प्रकरणांच्या आधारे अंमलबजावणी संचालनालयाने मनी लॉंड्रिंगचा गुन्हा दाखल केला होता. देशात आणि परदेशातून पीएफआयच्या २९ खात्यांमध्ये निधी आल्याचे तपासात उघड झाले आहे. डमी शेल कंपन्यांकडून हवाला व अन्य माध्यमातून निधी पाठविला जात होता. हा पैसा भारतातील पीएफआयच्या दहशतवादी आणि बेकायदेशीर कारवायांसाठी वापरला जातो.

## अपारंपरिक युद्ध तंत्रे नवीन आव्हाने उभी करतील- राजनाथसिंह

**नवी दिल्ली:** अपारंपरिक युद्धामुळे संरक्षण क्षेत्रात नवीन आव्हाने निर्माण झाली असून वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाला चालना मिळाली आहे. ड्रोन, सायबर युद्ध, जैव-शस्त्रे आणि अवकाश या क्षेत्रातील अपारंपरिक युद्ध तंत्राने नवी आव्हाने उभी केली आहेत, असा विश्वास संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी व्यक्त केला. नवी दिल्लीत डेअर टू ड्रीम ५.० इनोव्हेशन कॉन्टेस्टच्या उद्घाटनप्रसंगी संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी ही माहिती दिली. पारंपरिक युद्धात होत असलेल्या बदलांवर राजनाथ सिंह म्हणाले की, तंत्रज्ञानामुळे आज शस्त्रे आणि उपकरणांमध्ये मोठे बदल होताना दिसत आहेत.

# हमास जिवंत आहे आणि राहील

## अयातुल्ला अली खामेनीचा इशारा

**इराण :** इस्रायलच्या हल्ल्यात हमास प्रमुख याह्या सिनवार यांचा मृत्यू झाला आहे. हमासचा नेता याह्या सिनवारच्या मृत्यूनंतर अमेरिका आणि जर्मनीने गाझा पट्टीतील संघर्ष संपवण्याच्या दिशेने सहज प्रगती करता येईल, असा दावा केला आहे. दरम्यान, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी मोठे वक्तव्य केले आहे. याह्या सिनवार यांच्या मृत्यूनंतर हमास संपली नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी म्हणाले की, हमासचे अस्तित्व संपलेले नाही. हमास अजूनही आहे. नेत्यांच्या मृत्यूनंतरही हे आंदोलन थांबणार नाही. त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, याह्या सिनवार यांच्या मृत्यूनंतर हमासला मोठा धक्का बसला आहे. मात्र, यामुळे इस्रायलविरोधातील विरोध कमी होणार नाही. याह्या सिनवार यांच्या मृत्यूने हा निषेध संपणार नाही. उल्लेखनीय आहे की १७ ऑक्टोबर रोजी इस्रायलने याह्या सिनवारच्या हत्येची पुष्टी केली होती. सिनवार हा ७ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या हल्ल्याचा मास्टरमाईंड होता. या हल्ल्यात इस्रायलमध्ये १२०० लोकांचा मृत्यू झाला असून २५० हून अधिक लोकांना ओलीस ठेवण्यात आले आहे. हमासचे नेते याह्या सिनवार यांच्या मृत्यूनंतर, जर्मनीचे परराष्ट्र मंत्री ॲनालेना बेअरबॉक आणि अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटोनी ब्लिंकन यांनी एका संयुक्त निवेदनात म्हटले आहे.



**म्हापसा / गोवा :** रस्ता रूंदीकरण आणि जंक्शनवरील वाहतुकीला अडथळा निर्माण करणारी एकूण ३५ बेकायदा गाळेवाजा दुकाने म्हापसा पालिकेने जेसीबीच्या सहाय्याने पोलीस बंदोबस्तात जमीनदोस्त केली. विशेष म्हणजे यामध्ये उपनगराध्यक्षांच्या बांधकामाचाही समावेश आहे.

## किनारी भागातील हवामानाचा अभ्यास करणार

**मडगाव :** किनारी भागातील वाढत चाललेली धूप व वातावरणातील बदलामुळे होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला जात आहे. अहवालानंतर राज्य सरकार इतर राज्यांसोबत संयुक्त बैठक घेऊन यावर चर्चा करणार आहे. यातून त्या राज्यांनाही फायदा होऊ शकतो व योग्य उपाययोजना करणे सोपे जाईल, असे पर्यावरणमंत्री आलेक्स सिक्वेरा यांनी सांगितले.

समुद्राच्या पाण्याची पातळी वाढल्याने शॅक्स पाण्याखाली गेल्याच्या वृत्तानंतर पर्यावरण मंत्री आलेक्स सिक्वेरा यांनी नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट एजन्सीच्या अधिकाऱ्यांसह माजोर्डा किनारी पाहणी केली.

## ५ वर्षाच्या मुलीवर सामूहिक अत्याचार

**बलिया :** उत्तर प्रदेशातील बलिया येथील सदर कोतवाली परिसरात तीन अल्पवयीन मुलांनी पाच वर्षांच्या निष्पाप अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार केला आहे. या घटनेने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी तीन अल्पवयीन मुलांवर गुन्हा दाखल केला आहे. सर्वात मोठी आश्चर्याची बाब म्हणजे बलात्काराची घटना घडलेल्या तीन मुलांपैकी एक ६ वर्षांचा आहे. दरम्यान, अन्य दोन मुलांचे वय १३ व १६ वर्षे असल्याचे सांगण्यात येत आहे.

# मुख्यमंत्री शिंदे पुन्हा गुवाहाटीला जाणार

## प्रचाराचा नारळ फोडणार देवीच्या मंदिरात

वृत्तसंस्था



**नवी मुंबई :** राज्यात विधानसभा निवडणुकांच्या तारखा अखेर जाहीर झाल्या आहेत. त्याअनुषंगाने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. यातच आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुन्हा एकदा गुवाहाटीला जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. गुवाहाटीचा दौरा केल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या गळयात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली होती. त्यामुळे मुख्यमंत्री झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी गुवाहाटीमधील कामाख्या देवीचे दर्शन घेतले होते. आता पुन्हा एकदा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते गुवाहाटीला जाऊन कामाख्या देवीचे दर्शन घेणार असल्याचे सांगितले जात आहे. एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांसह शिवसेनेतून बंड केले होते. तेव्हा त्यांनी सूरत आणि त्यानंतर गुवाहाटीचा दौरा केला होता. यावेळी महाविकास आघाडी सरकार अल्पमतात आल्याने उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता.

# जेएनयूमध्ये शिवाजी महाराजांच्या नावाने अभ्यासक्रम

## महाराष्ट्र सरकारने दिला निधी

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली:** जवाहरलाल नेहरू विद्यापीठात (जेएनयू) छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने नवीन अभ्यास केंद्र सुरू करण्यात येणार आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील धोरण, शासन यावर आधारित अभ्यासक्रम शिकवला जाईल. या अभ्यास केंद्रात 'अखंड भारत' च्या संकल्पनेवरही अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. या अभ्यास केंद्रासाठी महाराष्ट्र सरकारकडून १० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. या निधीचा वापर केंद्राच्या सुरुवातीच्या संशोधन प्रकल्पांना मदत करण्यासाठी होणार आहे.

शिवाजी महाराजांचे नेतृत्व, शासन, लष्करी रणनीती आणि अविभाजित भारताला आकार देण्यासाठी केलेल्या योगदानाचा शोध घेण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. या अभ्यास केंद्राविषयी माहिती देताना जेएनयूच्या कुलगुरू संतीश्री डी. पंडित म्हणाल्या की, भारतीय ज्ञान प्रणालींमध्ये बदल घडवून आणण्यासाठी आणि भारताच्या सुरक्षेचा आणि धोरणात्मक विचारांच्या अभ्यासासाठी हे केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

# नमो शेतकरी सन्मानचे अनेक अर्ज बाद

वृत्तसंस्था

**लाखणगाव / पुणे :** केंद्र सरकारच्या वतीने शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री किसान सन्मान योजना व राज्य सरकारच्या वतीने नमो शेतकरी सन्मान योजना सुरू करण्यात आल्या असून या माध्यमातून प्रत्येक शेतकऱ्याला केंद्र सरकारचे एका वर्षासाठी ६ हजार रुपये व राज्य सरकारच्या वतीने एका वर्षासाठी सहा हजार रुपये सन्मान निधी मिळत आहे; परंतु सध्या या दोन्ही योजनांमध्ये अर्ज केलेल्या अनेक शेतकऱ्यांचे अर्ज बाद होत असल्याने शेतकरी योजनेपासून वंचित आहेत त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.

### योजनेपासून वंचित राहिल्याने शेतकरी नाराज

शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री किसान सन्मान योजना व राज्य सरकारची 'नमो शेतकरी सन्मान योजना' अशा राज्य व केंद्र सरकारच्या दोन योजना सुरू असून या योजनांमध्ये शेतकरी असणाऱ्या नागरिकांना केंद्राचे सहा हजार रुपये व राज्य सरकारचे सहा हजार एका वर्षासाठी मिळत असतात.

# उत्तर कोरियाचे सैन्य रशियात; ब्रिटन घाबरले

## चीनच्या पाठिंब्याने चिंता वाढली

वृत्तसंस्था

**बीजिंग :** उत्तर कोरियाचे सैन्य रशियात पोहोचल्यानंतर ब्रिटनही घाबरले आहे. आता उत्तर कोरियापाठोपाठ चीनही रशियात आपले सैन्य पाठवू शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. ब्रिटनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी शुक्रवारी युक्रेनविरुद्धच्या युद्धात रशियाला चीनकडून पाठिंबा दिल्याबद्दल चिंता व्यक्त केली. त्यांनी आपल्या चिनी समकक्षांना आपल्या देशातील कंपन्यांना रशियन सैन्याला उपकरणे पुरवण्यापासून रोखण्याचे आवाहन केले. ब्रिटनचे परराष्ट्रमंत्री डेव्हिड लॅमी यांनी शुक्रवारी बीजिंगमध्ये चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्याशी भेट घेतली. एक दिवसापूर्वीच उत्तर कोरियाच्या सैनिकांचा रशियात पोहोचण्याचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. हे युक्रेन आणि दक्षिण कोरियाने जारी केले आहे. उत्तर कोरियाने रशियामध्ये युक्रेनच्या विरोधात आपले सैन्य पाठवल्याचा दावा व्हिडिओमध्ये करण्यात आला आहे. यानंतर आता चीनकडूनही धमकी येऊ लागली आहे. अशा वेळी डेव्हिड लॅमी चीनच्या दौऱ्यावर आहेत. जुलैमध्ये मजूर पक्ष सत्तेवर आल्यानंतर चीनला भेट देणारे ते पहिले कॅबिनेटमंत्री आहेत. त्यांनी शुक्रवारी चीनचे उपप्रधानमंत्री डिंग शिउक्सियांग यांची भेट घेतली आणि त्याच दिवशी नंतर परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्याशीही चर्चा केली.

# किरकोळ महागाई दरात १.१७ टक्क्यांची वाढ

वृत्तसंस्था


**पणजी :** गेले दोन महिने राज्यातील महागाई दरात सतत वाढ होत आहे. ऑगस्ट महिन्यात गोव्यातील किरकोळ महागाई दर ३.०४ टक्के होता. सप्टेंबर महिन्यात त्यात १.१७ टक्क्यांनी वाढ होऊन तो ४.२१ टक्के झाला. महागाई दर कमी असण्याच्या यादीत गोवा देशात चौथ्या स्थानी राहिला. केंद्रीय सांख्यिकी आणि अंमलबजावणी खात्याने जारी केलेल्या अहवालानुसार ही माहिती मिळाली आहे.

### अहवालानुसार महागाई दर

अहवालानुसार सर्वात कमी महागाई दर मिझोरममध्ये होता. येथे सप्टेंबरमधील महागाई दर केवळ ३.१४ टक्के होता. यानंतर सिक्कीम (३.२७ टक्के), नागालँड (३.८ टक्के), गोवा (४.२१ टक्के), पश्चिम बंगाल (४.२७ टक्के), तेलंगणा (४.४ टक्के), हिमाचल प्रदेश (४.५९ टक्के), उत्तराखंड (४.६७ टक्के), आंध्र प्रदेश (४.७५ टक्के) यांचा क्रमांक लागतो. केंद्रशासित प्रदेशांत दिल्ली येथील महागाई दर ३.६७ टक्के होता. सप्टेंबरमध्ये देशात सर्वाधिक ७.३६ टक्के महागाई दर छत्तीसगढमध्ये होता.

सप्टेंबर महिन्यात अन्नधान्य, इंधन, कपडे, भाजीपाला व अन्य वस्तूंच्या किमतीत वाढ झाल्याने गोव्यासह संपूर्ण देशातील महागाई दर किंचित वाढला आहे. सप्टेंबर महिन्यात संपूर्ण देशासाठी महागाई दर ५.४९ टक्के होता. हा गेल्या नऊ महिन्यातील उच्चांक ठरला आहे. रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी किरकोळ महागाई दर ४.३ टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे. आरबीआयने महागाई दराची मर्यादा ४ टक्के इतकी ठेवली आहे.

### गोवा देशात चौथ्या स्थानी



केंद्रशासित प्रदेशांत दिल्ली येथील महागाई दर ३.६७ टक्के होता. सप्टेंबरमध्ये देशात सर्वाधिक ७.३६ टक्के महागाई दर छत्तीसगढमध्ये होता.

# राजेंद्र मस्केंची भाजपला सोडचिठ्ठी!

**स्पष्टीकरण** लवकरच राजकीय निर्णय घेणार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीचे लोकप्रिय जिल्हाध्यक्ष श्री. राजेंद्र मस्के यांनी आज संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालय बीड येथे शेकडो कार्यकर्त्यांच्या साक्षीने भारतीय जनता पार्टीला सोडचिठ्ठी देऊन भाजप मुक्त होण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

मा. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात विश्वास व्यक्त करून, भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. पक्षाने जिल्हाध्यक्ष पदाची दिलेली जबाबदारी अथक परिश्रम घेऊन प्रामाणिकपणे निभावली. पक्ष विचार, पक्षाचे कार्यक्रम सामान्य जनतेपर्यंत पोहचून पक्ष विस्तारासाठी तन मन धनाने काम केले.

जिल्ह्याच्या कानाकोपऱ्या पर्यंत पक्षाचा कार्यक्रम व पक्षाचे नाव पोहोच केले. परंतु दुर्दैवाने भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेतृत्वाने कामाची दखल घेतली नाही. उलट दुजाभाव करत विरोधकावर मर्जी दाखवून कोट्यावधीचा निधी देऊन, त्यांना बळ देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला. राजकीय आणि विकास कामातही भाजपा पदाधिकाऱ्यांची दखल सत्ता असताना देखील घेतली गेली नाही.




लोकसभा निवडणुकीत लोकनेत्या पंकजाताई यांच्या विजयासाठी प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत यंत्रणा उभी केली. विजयासाठी कष्ठ घेतले. दुर्दैवाने पराभवानंतर व्यक्त केलेली शंका मनाला वेदना देणारी आहे. पराभवाचे खापर एकट्या मराठा समाजावर फोडून मोकळे झाले. मागील वर्षी बैलगाडा शर्यती दरम्यान प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या साक्षीने पंकजाताईंनी विधानसभेची उमेदवारी देण्याचे संकेत दिले. परंतु आज विधानसभा रणधुमाळी चालू असताना पक्षाने विचारपूस केली नाही. यावरून स्पष्ट येते की, भारतीय जनता पार्टीला राजकीय नकाशावर बीड जिल्ह्याची गरज उरलेली नाही. सर्व बळ आणि ताकत विरोधकांना देण्याचा संकल्प देवेंद्र फडणवीस यांच्या भाजपाने घेतला आहे. जिह्यातील पक्ष हितासाठी प्राधान्य दिले गेले नाही. अशा नेतृत्वात काम करणे दुरापस्त आहे. म्हणून आज जिल्हाध्यक्ष पदासह भारतीय जनता पार्टीचा त्याग करत आहे. आगामी दोन तीन दिवसात योग्य तो राजकीय निर्णय घेतला जाईल.

# फेक कॉल,मोबाईल हॅकिंगचा सुळसुळाट

सावध:राहुरीतील नागरीक हैराण




राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी तालुक्यात नागरीकांना फेक कॉल व मोबाईल हॅकिंगचा प्रकार मोठ्या प्रमाणात होत असुन या प्रकारामुळे तालुक्यातील नागरिक हैराण झाले असून अनेकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत आहेराहुरी तालुक्यातील अनेकांना दोन दिवसांपासून फेक कॉल येत असुन संबंधीत व्यक्तींशी संपर्क करणारी व्यक्ती कोर्टातुन वकील बोलत असल्याचे भासवून नागरीकाशी संवाद साधत आहे अमुक एका व्यक्तीकडून आपण पैसे घेतले असल्याचे सांगून त्या व्यक्तीला पैसा पाठवण्याचा आग्रह धरते परंतु ज्यांच्या नंबर पाठवते त्यांना ही माहिती नसते की आपल्या नंबरचा अशा प्रकारे वापर होत आहे

संबंधित व्यक्तीचे आधार कार्ड नंबर पेन काड १६– नंबर चा फॉर्म २ पासपोर्ट फोटो व सही असल्याचे सांगते इतर व्यक्तीगत माहिती ही फोन करणारी व्यक्ती सांगते या प्रकारामुळे अनेकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे तसेच अनेक नागरीकांचे मोबाईल मोठ्या प्रमाणात हॅक होण्याचे प्रमाण वाढले आहे तरी नागरिकांनी कुठल्याही अपरिचित साइट उघडु नये व संबंधित साइट वर क्लिक करु नये ऑनलाईन देवाणघेवाण करताना सावधानता बाळगावी.

# शिर्डी एक्सप्रेस लुटीचा प्रयत्न फसला

दिलासा:सुरक्षा दलाच्या सतर्कतेमुळे घटना टळली

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

काकीनाडा–नागरसोल शिर्डी एक्सप्रेस रविवार रोजी मध्यरात्री परळी जवळच असलेल्या वडगाव दादाहरी येथे सिग्नल मध्ये तांत्रिक बिघाड करून लुटण्याचा प्रयत्न रेल्वे सुरक्षा दलाच्या सतर्कतेमुळे असफळ ठरला असून यामध्ये एका कोच मधील दोन महिलांचे दागिने चोरट्यानी लुटले असल्याची माहिती मिळत असून याबाबत अद्याप रेल्वे पोलिसात अधिकृत गुन्हा दाखल झालेला नाही.

ट्रेन नंबर १७२०६ काकीनाडा ते नागरसोल धावणारी शिर्डी एक्सप्रेस परळी जवळील वडगाव दादाहरी येथे परळीचा दिशेने असलेल्या आउटर सिग्नलला चोरट्यानी तांत्रिक बिघाड करून उभी केली.अंदाजे ७–८



चोरट्यानी ही एक्सप्रेस लुटण्याचा प्रयत्न केला.ट्रेन मध्ये कर्तव्यावर असलेल्या रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे

चोरट्यांचे रेल्वे लुटीचे मनसुभे उधळून लावत चोरट्याना पळवून लावले. यामुळे रेल्वे लुटीचा मोठा अनर्थ टळला.या घटनेत एका बोगी मध्ये २ महिलांचे दागिने चोरट्याने लंपास केली अशी माहिती समोर आली असून याबाबत अधिकृत दुजोरा मिळालेला नाही अथवा रेल्वे पोलिसात कसलाही प्रकारचा गुन्हा नोंद करण्यात आला नाही. सदरील घटनास्थळ हे सोनपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असून वारंवार या ठिकाणी घडत असलेल्या घटनेची दखल घेत लोहमार्ग पोलीस उप विभागीय पोलीस अधिकारी लोहकरे लोहमर्ग स्थानिक गुन्हे पान २ वर...

# केजचे बंटी–बबली फक्त

अंकुश ढोबळे: सहा महिने मतदार संघात चार वर्षे हानिमुनला?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघात बंटी,बबली फक्त निवडणूकी पुरते मतदार संघात मतदाराची दिशाभूल करण्या साठी मतदार संघात येतात असे अंकुश ढोबळे यांनी म्हटले आहे कारण बंटी, बबली एकदा सहा महिने मतदार संघात येतात निवडणून येतात व नंतर चार वर्षे पाच महीने मतदार संघाची वाटच बंटी, बबलीला सापडत नाही मग बंटी बबली काय चार वर्षे हानिमुनला जातात का असा सवाल अंकुश ढोबळे यांनी केला आहे कारण बंटी, बबली मतदार संघात निवडणुकीच्या नंतर तोंड सुध्दा दाखवायला येत नाहीत ही मोठी समस्या आहे बंटी, बबलीचे पुणे मुंबईला कोट्यवधी




रुपयांची प्रोपर्टी आहे मोठे मोठे बंगले आहेत त्यामुळे बंटी, बबली निवडणूक झाल्यानंतर तीकडेचे हवेत असतात व मतदार संघात एक टरबुज कायम काही तरी खोड्या करण्यासाठी फिरत आहे व भ्रष्टाचार करुन कोट्यवधी रुपयांचा निधी हडप करण्यासाठी टरबुज कायम मतदार संघात फिरत असते तसेच मतदार संघाची बंटी, बबली, टरबुज यांनी मिळुन केज अंबाजोगाई मतदार संघाची वाट लावली आहे असे मत भावी उमेदवार अंकुश ढोबळे यांनी व्यक्त केले आहे म्हटले आहे.

# अनधिकृत कर पावत्या जमा करा

राजेभाऊ फड :परळीतील जनतेला आवाहन

परळी पुण्यभूमी/प्रतिनिधी

परळी नगर पालिकेकडून अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली आहे. परळी नगर पालिकेने जनतेची गैर कायदेशीर मार्गाने जवळपास १०० कोटी रुपयांची फसवणूक केली आहे. वास्तविक पाहता अशा स्वरूपाचा कर घेण्याबाबत कुठलेही आदेश नाहीत किंवा कुठलाही शासन आदेश नाही. मालमत्ता करासाठी शासन नियमानुसार भरलेल्या पैशांपेक्षा एक टक्का अतिरिक्त शुल्क नगर पालिकेकडून वसूल केले जात आहेत. हा प्रकार नियमबाह्य



असून, हेच पैसे जनतेला परत करा व यापुढे असा कर वसूल केला जाऊ नये अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात न्यायालयीन लढाई सुरू असून, मागील पाच वर्षांत याची झळ सोसलेल्या नागरिकांनी कर भरलेल्या पावत्या संपर्क कार्यालयात आणून द्याव्यात असे आवाहन त्यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,परळी वैजनाथ नगरपरिषद परळी वैजनाथ या कार्यालयात मालमत्तेची नोंदणी करण्यासाठी नाव नोंदणी अर्ज दाखल केल्या नंतर सदरील मालमत्तेच्या नावाची नोंदणी प्रमाणपत्र देते वेळी अनाधिकृतपणे कर आकाराला जातो व शहरातील नागरिकांवर त्याचा विनाकारण भुर्दंड पडतो. अशा प्रकारचा कर आकारण्याची कोणतीही तरतूद नगरपरिषद कायद्यामध्ये, नियमा मध्ये व शासन निर्णयामध्ये नसतानाही सामान्य नागरिकांना वेठीस धरून अशा प्रकारची कर वसुली परळी नगरपरिषद कार्यालयामार्फत केली जाते अन्यथा त्यांच्या मालमत्तेची नोंद नगरपरिषद पान २ वर...

# मतदान यंत्रांचे पहिले सरमिसळ पूर्ण

निवडणूक:जिल्हा प्रशासन झाले सज्ज




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा सार्वत्रिक निवडणूक मतदार संघातील मतदान यंत्रांचे प्रथम स्तरीय संगणकीकृत सरमिसळ (1ST Randomization) आज झाले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात प्रथमस्तरीय संगणकीकृत सरमिसळ प्रक्रियेच्या वेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक, उपजिल्हानिवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, तहसीलदार अविनाश शिंगटे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रक्रिया अंतर्गत प्रथमस्तरीय सरमिसळमध्ये २८९७ बॅलेट युनिट आणि २८९७ कंट्रोल युनिट आणि ३१३८ व्हीव्हीपॅटचे वाटप विधानसभा मतदार संघांना केले. हे मतदान यंत्र विधानसभा निहाय वाटप करणेकरीता गोदाम उघडण्याची परवानगी व पान २ वर...

# परळी विधानसभेच्या उमेदवारीचे संकेत!

पडघम:सुनील गुट्टेंनी घेतलेला आढाव पक्षश्रेष्ठीकडे सुपूर्त

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या राज्यात विधान सभेच्या उमेदवारी बाबत अनेक उमेदवारांची आप आपल्या पक्षश्रेष्ठीकडे उमेदवारी मिळवण्यासाठी भेटी घेतल्या जात आहेत त्यातच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटा कडेही परळी विधानसभा मतदारसंघात आपल्यालाच उमेदवारी मिळावी या करिता आप आपल्या परीने इच्छुक उमेदवार भेटी घेत असताना पक्षाच्या कोअर कमिटीने युवानेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांना तातडीने मुंबई येथे बोलावून पक्षश्रेष्ठीकडुन उमेदवारीचे संकेत दिल्याचे कळते आहे.

युवानेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांनी आज रविवारी सकाळी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार साहेब, राज्य अध्यक्ष जयंत पाटिल,खा.सुप्रिया



सुळे,आ.रोहित दादा पवार यांची भेट घेऊन परळी विधानसभा मतदार संघा विषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चा दरम्यान परळी मतदारसंघात काढलेल्या शेतकरी संवाद यात्रेचा अहवाल, नौकरी महोत्सव अदी कार्याचा कार्य अहवाल पक्षश्रेष्ठींना देऊन मतदार संघाची सद्य परिस्थिती वर सखोल चर्चा करण्यात आली. पक्षश्रेष्ठींकडून शेतकरी संवाद यात्रा नौकरी महोत्सवाची दखल घेऊन कौतुक केले असून अजून ही पुढे आशाच कार्याची अपेक्षा पक्षश्रेष्ठीकडुन युवानेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे या माता व पुत्राला सुचक विधान करुन उमेदवारी चे संकेत दिले असल्याचे बोलले जात आहे.याच बैठकीत यावेळी परळी मतदारसंघात सुरू केलेल्या शेतकरी संवाद यात्रेबद्दल साहेबांना माहिती दिली. तसेच मतदारसंघात आयोजित रोजगार मेळावे, ज्यातून हजारो तरुणांना पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर पान २ वर...

# रस्त्यावरचे अतिक्रमण मर्यादेच्या बाहेर !

अपघात वाढले: अतिक्रमणामुळे जीव धोक्यात

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

टाकळी फाटा ते चिंचोली माळी ते हादगाव रस्त्यावर दोन्ही बाजूनी स्थानिकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले आहे. यामुळे ३३ फुटाचे रस्ते केवळ १०–१२ फूटच वाहतुकीसाठी उपलब्ध आहे.त्यामुळे वाहन धारकांना मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होतो आहे त्यामुळे नागरिकांना प्रवास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होतो याचे संमंधीत प्रशासनाला काही देणे घेणे नाही का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे तसेच अतिक्रमणा मुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे.कारण रोड लगत असलेल्या जनावरे, जनावरांच्या दावनी या ऐन रोड आहेत त्यामुळे नागरिकांना जिव धोक्यात घालून



टाकळी फाटा ते चिंचोली माळी ते हादगाव रस्त्यावर प्रवास करावा लागतो आहे.अशा अतिक्रमणामुळे मोठ्या वाहनांना तर या रोडने प्रवास करण्यासाठी संधीच नाही.साधी दुचाकी चालवताना अनेक नागरीकांचे अपघात सुध्दा झालेले आहेत तसेच केज टाकळी –चिंचोली माळी – वरपगाव बस या मार्गावरून जाते परंतु रोडवर अतिक्रमण असल्याने बस वेळेवर पोहचत नाही त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना खुप मोठा सामना करावा पान २ वर...

**रणधुमाळी** केज मक्तेदारी यंदा मावळणार!

# सत्ताधारी म्हणतात विकास आम्हीच केला?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज मतदार संघात मागच्या अनेक दिवसांपासून केज विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे तिकीट कोणाला मिळणार आणि महायुती पुन्हा आपली जागा सुरक्षित ठेवणार का ? या चर्चेला उधाण आलेले आहे. मात्र यामध्ये मागच्या अनेक वर्षांपासून राखीव असलेल्या विधानसभा मतदारसंघाला नेमके काय मिळाले ? हे मात्र अद्यापही दिसून येत नाही. त्यामुळे विद्यमान आमदार जरी विकास केल्याचा डंका पिटत असतील आणि इच्छुक उमेदवार आम्ही निवडून आल्यानंतर चंद्र तारे तोडून आणून अशा वल्गना करत असतील तरीही केज विधानसभा मतदारसंघ हा मागच्या कित्येक वर्षांपासून आहे त्याच परिस्थितीमध्ये आहे. केज विधानसभा मतदारसंघावर मागच्या



कित्येक वर्षांपासून मुंदडा कुटुंबीयातील सदस्यांची मक्तेदारी आहे. स्वर्गीय विमलताई मुंदडा यांच्यानंतर पोट निवडणूक वगळता त्याच कुटुंबाकडे सत्ता आहे, मग तो पक्ष कोणताही असो. केज विधानसभा मतदारसंघांमध्ये केज, आंबेजोगाई हे दोन तालुके आणि नेकनूर शहरासारखा एक मोठा भाग समाविष्ट झालेला आहे. परंतु या मतदारसंघांमध्ये अद्यापही कुठलेच असे शाश्वत काम झालेले नाही. बेरोजगारांच्या हाताला काम मिळेल असा प्रकल्प सत्ताधारी आमदार नमिता मुंदडा यांच्याकडून कार्यान्वित झालेला नाही. पूर्ण पाच वर्ष मतदार संघातील नागरिकांना केवळ आश्वासने द्यायची असाच काहीसा प्रकार दिसून येत आहे. विधानसभा मतदारसंघांमध्ये अद्यापही एमआयडीसी कार्यान्वित झालेली नाही. केज शहरातील फलोत्पादन च्या जागेचा प्रश्न रेंगाळत पडलेला आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या गावकऱ्यांना आपला भाजीपाला विकायला बसण्यासाठी जागा सुद्धा उपलब्ध करून देता आलेली नाही.केज शहर दिवसेंदिवस झपाट्याने वाढत असताना साधे खेळाचे मैदान असो किंवा एखादा बगीचा सुद्धा उभारता आलेला नाही. ग्रामीण भागातील काही तुरळक रस्ते वगळता आजही खड्ड्यांतून आणि गुडघाभर चिखलातून नागरिकांना चालावे लागत आहे. केज शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न सोडवून छोट्या व्यावसायिकांना कायमस्वरूपी जागा देण्यामध्ये सत्ताधारी आमदार नमिता मुंदडा फेल ठरलेल्या आहेत. शहर म्हणून आणि आपण त्याचे काही देणे लागतो हा विचार करून अद्यापही न नळ योजना नवीन तर सोडाच परंतु आहे ती सुद्धा दुरुस्त करता आलेली नाही. केज शहरातील जो विस्तारित भाग आहे त्या भागात अद्यापही नळ योजना पोहोचलेली नाही. अंतर्गत रस्ते हे अपवाद वगळता जैसे थे आहेत. त्यामुळे पान २ वर...

# नाना महाराज पुण्यतिथीत, ज्ञानयज्ञ

अध्यात्मिक:भाविक–भक्तांनी उपस्थित रहावे

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेल्या उत्रेश्वर पिंपरी येथे सद्गुरू ज्ञानेश्वर माऊली पिंपरी कर यांचे धाकटे बंधू सद्गुरू ज्ञानेश्वर माऊली यांचे धाकटे बंधू शांतीब्रम्ह सद्गुरू श्रीधर नाना यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमीत्त

शांति ब्रम्ह सद्गुरू श्रीधर नाना महाराज यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमीत्त अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज गिरी यांनी आयोजित केला आहे.याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील उत्रेश्वर पिंपरी/चाकरवाडी येथील महान संत सद्गुरू ज्ञानेश्वर माऊली पिंपरीकर यांचे धाकटे बंधू सद्गुरू ज्ञानेश्वर




माऊली यांचे धाकटे बंधू शांतीब्रम्ह सद्गुरू श्रीधर नाना यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमीत्त अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा सुरू असुन या साप्ताहात श्रीमद्भागवत कथा ह.भ.प. माधव महाराज शास्त्री माळाकोळीकर यांच्या मधुर वाणीतुन भाविकांना श्रवण करण्यास मिळत आहे. शुक्रवारी सायंकाळी ९ ते ११ यावेळी ह.भ.प. वासुदेव शास्त्री देशमुख टाकळीकर यांचे सुश्राव्य किर्तन संपन्न झाले.यावेळी बोलताना उपकार असे आरोनी उरला ,आपुलें तयाला नाहीं ,लाभावरी सांपडलें काम ,आपला तो श्रम न विचारी, जीवा ऐसें देखे आणिकां जीवांसी। निखळचि रासि गुणांचीच,तुका म्हणे देव तयांचा पांगिला । न भंगे संचला धीर सदा ,या अभंगावार विवेचन करताना जो दुसऱ्यावर पान २ वर...